रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १०
www.ramprahar.com
गुरुवार, २७ जुलै २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

'राज्यातील पॅथॉलॉजी लॅब नोंदणीबाबत धोरण ठरवणार'/२
माथेरानच्या डोंगररांगांमध्ये भूस्खलन; जमिनीला भेगा/५
आजपासून भारत-वेस्ट इंडीज वनडे मालिका/८

## राज्यात आणखी दोन दिवस अतिवृष्टीचा इशारा



**मुंबई :** बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्यामुळे राज्यात आणखी दोन दिवस अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले असून याची तीव्रता मंगळवारी वाढली. हे क्षेत्र अधिक तीव्र होत असून ते वायव्य दिशेने सरकत आहे. या प्रणालीसोबतच अरबी समुद्रात दक्षिण कोकण ते उत्तर केरळपर्यंत किनारपट्टी भागात ढगांची द्रोणीय स्थिती निर्माण झाली आहे. पूर्व-पश्चिम वाऱ्यांचे क्षेत्रही महाराष्ट्राजवळ प्रभावशाली आहे. याचा एकत्रित परिणाम म्हणून राज्यात मान्सूनचा जोर २८ जुलैपर्यंत कायम राहण्याची शक्यता आहे. यामुळे शुक्रवारपर्यंत रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये तसेच सातारा जिल्ह्यातील घाट परिसरात गुरुवारीही रेड अलर्ट देण्यात आला आहे.

# दर्डा पिता-पुत्रासह सहा जणांना तुरुंगवास

## कोळसा घोटाळाप्रकरणी दिल्ली विशेष न्यायालयाचा निर्णय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कोळसा खाण घोटाळा प्रकरणात दिल्ली विशेष कोर्टाने राज्यसभेचे माजी खासदार विजय दर्डा आणि त्यांचे पुत्र देवेंद्र दर्डा यांच्यासह सहा आरोपींना शिक्षा सुनावली.



विजय दर्डा व त्यांचे पुत्र देवेंद्र दर्डा यांना चार वर्षांचा तुरुंगवास सुनावण्यात आला आहे. त्यांच्यासह जेएलडी यवतमाळ एनर्जी प्रा. लि. चे संचालक मनोजकुमार जयस्वाल यांना चार वर्षांचा तुरुंगवास, तर निवृत्त कोळसा सचिव एच. सी. गुप्ता, दोन ज्येष्ठ अधिकारी के. एस. क्रोफा आणि के. सी. समरीया यांना तीन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. दिल्ली विशेष न्यायालयाने १३ जुलैला या प्रकरणात त्यांना दोषी ठरवले होते. त्यामुळे आता दर्डांना सहा वर्षे निवडणूक लढवता येणार नाही.

१९९९ ते २००५ या कालावधीमध्ये जेएलडी यवतमाळ यांना जे जुने ब्लॉक देण्यात आले होते त्याची माहिती लपवून पुन्हा युपीए सरकारच्या काळामध्ये गैरमार्गाने कंत्राट मिळावल्याचा आरोप या पाच जणांवर होता. युपीए सरकारच्या काळात गाजलेल्या घोटाळ्यांमध्ये कोळसा घोटाळ्याचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. या प्रकरणातील ही तेरावी शिक्षा आहे. यासंदर्भात पंतप्रधान मनमोहन सिंह यांना लिहिलेल्या पत्रात माहिती लपवण्याचा आरोप करण्यात आला होता. याच आधारावरही शिक्षा सुनावण्यात आली आहे.

छत्तीसगडच्या कोळसा घोटाळ्यात अनेक मोठ्या नावांचा समावेश आहे. या प्रकरणात अनेक बडे अधिकारी आणि राजकारणाशी संबंध असलेले अनेक जण रायपूर तुरुंगात कैद आहेत. यात आयएएस अधिकारी समीर बिश्नोई, सौम्या चौरसिया, मुख्यमंत्र्यांचे उपसचिव, सूर्यकांत तिवारी, कोळसा घोटाळ्यात सिंडिकेट म्हणून काम करणारे सुनील अग्रवाल यांचा समावेश आहे. सीबीआयच्या माहितीनुसार, आतापर्यंत आरोप सिद्ध झालेले हे तेरावे प्रकरण आहे.

विजय दर्डा काँग्रेसकडून राज्यसभेवर खासदार होते. त्यामुळे या निकालाने दर्डा कुटुंबियांसमोरची आव्हाने वाढली आहेत. दर्डा पिता-पुत्राला १५ लाखांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.

# न्हावे गावासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार -लोकनेते रामशेठ ठाकूर

## स्वखर्चातून केलेल्या विविध विकासकामांचा शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या खर्चातून ४० लाख रुपयांचा निधी वापरून न्हावे गावात जलकुंभ, महिला मंडळाचे कार्यालय आणि व्यायाम शाळेचे नूतनीकरण करण्यात आले. या कामांचा शुभारंभ मंगळवारी (दि. २५) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाला. या वेळी त्यांनी न्हावे गाव ही माझी कर्मभूमी असून गावासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार, असे आश्वासन त्यांनी दिले.

पनवेल तालुक्याच्या न्हावे गावातील नागरिकांना पाण्याची समस्या भेडसावत होती. याबाबत गावातील महिलांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली होती. त्यांच्या समस्येची दखल घेऊन ३० लाख रुपयांची मदत केली होती. या निधीमधून न्हावे गावात जलकुंभ बांधण्यात आला आहे. या जलकुंभाची एक लाख १० लिटरची क्षमता असून या जलकुंभाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. जलकुंभ उभारण्याकरीता नंदकिशोर भोईर आणि नितीन भोईर यांनी जागा दिली असून त्यांचा या वेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दरम्यान न्हावे गावातील वनिता महिला मंडळाच्या कार्यालयाचे तसेच व्यायामशाळेचे नूतनीकरणही करण्यात करण्यात आले आहे. यासाठीही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी १० लाख रुपयांची मदत केली.

या विकासकामांच्या शुभारंभावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, माजी सरपंच चंद्रकांत भोईर, सरपंच हरेश्वर म्हात्रे, उपसरपंच प्रल्हाद पाटील, ग्रामपंचायत सदस्य सागरशेठ ठाकूर, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, सदस्या योगिता भगत, भाजप वाहतूक सेलचे हेमंत ठाकूर, सी. एल. ठाकूर, मनिषा पाटील, गव्हाणच्या माजी सदस्य स्नेहलता ठाकूर, जयवंत देशमुख, किशोर पाटील, सुहास भगत, प्रमोद कोळी, गाव अध्यक्ष तुषार भोईर, ग्रामपंचायत सदस्य देवेंद्र भोईर, विजया ठाकूर, महिला मंडळाच्या अध्यक्ष मिनाक्षी पाटील, **(पान २ वर..)**



# खतांचे लिंकिंग करणाऱ्या कंपनी मालकांवरही गुन्हे दाखल होणार -कृषीमंत्री धनंजय मुंडे

**मुंबई : प्रतिनिधी**

मोठ्या आणि प्रसिद्ध असलेल्या कंपन्या जास्त मागणी असलेल्या खताच्या सोबत आपल्याकडे उत्पादित करण्यात आलेले परंतु विक्री होत नसलेली खते शेतकऱ्यांना खरेदी करण्यासाठी डीलर आणि कृषी सेवा केंद्रांना सक्ती करायला लावतात. यावर चाप बसवण्याच्या दृष्टीने आता थेट संबंधित कंपनीच्या मालकावरच गुन्हा दाखल करण्याबाबत तरतूद केली जाईल, अशी माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात बुधवारी (दि. २६) विधानसभेत बोलताना दिली आहे.

कोणत्याही कंपनीचे खत बाजारात आणण्यापूर्वी त्या खताची चाचणी करून त्याचे प्रमाणीकरण करणे अनिवार्य आहे. अप्रमाणित खते कोणत्याही परिस्थितीत बाजारात येणार नाहीत, याचीही काळजी कृषी विभाग घेत असून यापुढे अधिक गांभीर्याने ती काळजी घेतली जाईल, असेही ना. मुंडे म्हणाले.

खतांबरोबरच बियाणे, कीटकनाशकांच्या उत्पादन आणि विक्रीमध्ये बऱ्याच प्रमाणात बोगसगिरी करून शेतकऱ्यांची फसवणूक केली जाते. यावर आळा बसावा यासाठी राज्य शासन नव्याने कडक कायदा आणत असून त्या कायद्याची संरचना मंत्रिमंडळ उपसमितीच्या माध्यमातून सुरू आहे.

या कायद्याची निर्मिती करीत असताना कृषी सेवा केंद्रांच्या संघटना, व्यापारी, डीलर्स यांच्या संघटना तसेच विविध तज्ज्ञांचेही सल्ले घेतले जात आहेत. या सर्वांना विचारात घेऊनच कायद्याची संरचना करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## रोह्यातील लाचखोर तलाठी जेरबंद

**रोहे : प्रतिनिधी**

जमिनीचे फेरफार नोंद मंजूर होऊन उतारा देण्याकरिता तलाठी संतोष चांदोरकर याने १० हजारांची लाच मागितल्याप्रकरणी लाचलुचपत (एसीबी) विभागाने बुधवारी (दि. २६) गुन्हा दाखल करून त्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. या आधीही या तलाठ्यावर महाड येथे दोन वेळा कारवाई झाली होती.

तक्रारदारांना जमिनीचे फेरफार नोंद उतारा देण्याकरिता आरोपी संतोष चांदोरकर (वय ४३, तलाठी, सजा भालगांव) यांनी तक्रारदारांकडे १०,००० रुपयांची मागणी करून लाच स्वीकारण्याची तयारी दर्शवली म्हणून बुधवारी रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## निवडक

### पीएम किसान योजनेच्या १४व्या हप्त्याचे आज वितरण

**मुंबई :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २७) सकाळी ११ वाजता राजस्थानमधील सिकर येथे केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या वतीने आयोजित पीएम किसान संमेलनानिमित्त पीएम किसान सन्मान योजनेतील ८.५ कोटी लाभार्थींच्या खात्यावर १४व्या हप्त्याची रक्कम वितरित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर या किसान संमेलनाच्या माध्यमातून प्रधानमंत्री मोदी हे देशातील शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत.

### मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर आज पुन्हा मेगाब्लॉक

**खोपोली :** मुंबई-पुणे एक्स्प्रेसवर मुंबई लेनवर गुरुवारी (दि. २७) दुपारी १२ ते २ या कालावधीत मेगाब्लॉक होणार आहे. २३ जुलै रोजी आडोशी बोगद्याच्या मागे दरड कोसळली होती. त्या ठिकाणचे अडकलेले दगड पाडण्यासाठी गुरुवारी मुंबई लेन पूर्णतः बंद करण्यात येणार आहे. छोट्या वाहनांना जुन्या मार्गावरून जाता येणार असल्याचे बोरघाट वाहतूक पोलीस उपनिरीक्षक योगेश भोसले यांनी कळविले.

# रायगड जिल्ह्यातील २० गावांचे होणार पुनर्वसन

## प्रस्ताव सादर करण्याच्या जिल्हा प्रशासनाच्या सूचना

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील अतिधोकादायक २० गावातील नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतरण करण्यात आले आहे, परंतु पुढील धोका लक्षात घेता या गावांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. तसे प्रस्ताव तयार झाल्यावर ते राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार आहेत.

खालापुरातील इर्शाळवाडीवर दरड कोसळल्यामुळे येथील २९ जणांचा मृत्यू झाला. ५७ जणांना बेपत्ता म्हणून जाहीर करण्यात आले. या गावचे चौक येथे पुनर्वसन करण्यात येणार आहे. त्याची कार्यवाही सुरू झाली आहे. याचबरोबर दरडप्रवण असलेल्या अतिधोकादायक २० गावांचेदेखील पुनर्वसन करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

तळीये येथे २०२१ साली झालेल्या दुर्घटनेनंतर जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या भुवैज्ञानिकांमार्फत संभाव्य दरडग्रस्त गावांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. **(पान २ वर..)**



**रायगड जिल्ह्यातील अतिधोकादायक २० गावांचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाने स्थानिक अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. प्रस्ताव आल्यानंतर तातडीने राज्य शासनाकडे पाठवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.**
**-संदेश शिर्के, निवासी उपजिल्हधिकारी, रायगड**

# उरणकरांनी घेतला औषधी रानभाज्यांचा आस्वाद

**उरण : वार्ताहर**

उरणमध्ये जिल्हास्तरीय रानभाज्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचे उद्घाटन मंगळवारी (दि. २५) जिल्हा कृषी विभागाच्या अधीक्षक उज्ज्वला बाणखेले यांच्या हस्ते झाले.



जिल्हास्तरीय महोत्सव उत्साहात

पावसाच्या सुरुवातीलाच शेताच्या बांधावर आणि माळरानावर विविध प्रकारच्या रानभाज्या उगवतात. नैसर्गिकरीत्या उगवणाऱ्या रानभाज्यांचे महत्त्व, आरोग्यासाठी होणारे फायदे, औषधी गुणधर्म आणि पाककृतीची सामान्यांनाही माहिती व्हावी यासाठी मंगळवारी उरणमध्ये जिल्हास्तरीय रानभाज्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. उरणमधील तेरापंथी सभागृह, नगर परिषदेच्या मराठी शाळेतील महाराष्ट्र भूषण नारायण धर्माधिकारी सभागृह, बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल, चाणजे येथील आद्य क्रांतिवीर बळवंत वासुदेव फडके सभागृह आदी ठिकाणी एकाच दिवशी हा महोत्सव भरविण्यात आला होता.

महोत्सवात विविध रानभाज्या ठेवण्यात आल्या होत्या. काही आदिवासी आणि शेतकऱ्यांनी रानभाज्या बनविण्याच्या विविध पद्धतीची माहिती करून दिली. उपस्थित नागरिकांनी विविध रानभाज्यांचा आस्वादही घेतला. विविध महिला बचत गट व शेतकऱ्यांचा प्रशस्तीपत्रक देऊन सत्कार करण्यात आला. **(पान २ वर..)**

## पेणमध्ये मुलीचा सर्पदंशाने मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील जिते गावातील १२ वर्षीय बालिकेचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याने गावात शोककळा पसरली आहे.

सारा रमेश ठाकूर (वय १२) ही मंगळवारी रात्री झोपली असताना रात्री मण्यार या विषारी सापाने तिला दंश केला. यामुळे तिला अस्वस्थ वाटू लागल्याने साराच्या वडिलांनी तत्काळ तिला उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तिला लस देण्यात आली, मात्र साराच्या प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने खासगी हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. येथेही प्रकृती सुधारत नसल्याने तिला अलिबाग येथे नेण्यात आले व येथून एमजीएम रुग्णालयात नेण्यात आले, परंतु या धावपळीत बराच वेळ गेल्याने तिचा एमजीएम रुग्णालयात मृत्यू झाला.




# पंतप्रधानांच्या हस्ते लाखो किसान समृद्धी केंद्रे देशाला समर्पित करणार

## भाजप प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुरुवारी राजस्थानातील सिकर येथे एका कार्यक्रमात १.२५ लाख पीएम किसान समृद्धी केंद्रे राष्ट्राला समर्पित करण्यात येणार आहेत. या केंद्रातून खत विक्रीबरोबरच शेतकऱ्यांना माती परीक्षण, बियाणे चाचणी अशा अनेक सेवासुविधा पुरविल्या जातील, अशी माहिती भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी (दि. २६) दिली. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



भाजप प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, संजय केनेकर, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते गणेश हाके, विनोद वाघ आदी या वेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी देशभरातील शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. यानिमित्त राज्यात १४ हजार ४२९ केंद्रांमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून आपण स्वतः नवी मुंबई येथील कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहोत, असेही बावनकुळे यांनी सांगितले.

बावनकुळे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी बी-बियाणे, औषधे, औजारे, खते यांच्या खरेदीसाठी वेगवेगळ्या दुकानात जावे लागते. पंतप्रधान किसान सुविधा केंद्र ही योजना शेतकऱ्यांना या सर्व सेवासुविधा एकाच ठिकाणाहून पुरविण्यासाठी सुरू करण्यात येत आहे. या केंद्रांमुळे शेतकऱ्यांची फसवणूक टळेल. शेतकऱ्यांना माती, बियाणे आणि खतांच्या चाचणीची सुविधा उपलब्ध करून देणे, केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरी कल्याणाच्या योजनांची माहिती देणे, पीक विमा योजनेची नोंदणी करणे अशा सुविधाही या केंद्रातून उपलब्ध केल्या जातील. देशभरात मागील वर्षी प्रायोगिक तत्त्वावर किसान समृद्धी केंद्रे सुरू करण्यात आली होती. त्याला मिळालेले यश पाहून किसान समृद्धी केंद्र कार्यन्वित करण्याचा पुढील टप्पा गुरुवारी प्रत्यक्षात येणार आहे.

भारतीय जनता पक्षाचे सर्व आमदार, खासदार, पदाधिकारी, किसान मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते वेगवेगळ्या ठिकाणी होणाऱ्या किसान समृद्धी केंद्रांच्या लोकार्पण कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत, असेही बावनकुळे यांनी सांगितले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून राज्यातील पूर परिस्थितीचा आढावा

**मुंबई : प्रतिनिधी**

अतिवृष्टी, पूरस्थिती, दरड कोसळण्यासारख्या नैसर्गिक आपत्तीमध्ये नागरिकांचा जीव वाचविणे आणि त्यांचे पुनर्वसन करणे हे शासनाचे प्रथम कर्तव्य आहे. त्यासाठी नियमाचा बाऊ न करता, वेळ पडली तर प्रसंगी आऊट ऑफ द वे जाऊन काम करावे लागले, तर त्याचा निर्णय जिल्हाधिकारी यांनी घ्यावा. जनहिताच्या प्रत्येक कार्यात शासन तुमच्यासोबत आहे. आपत्ती निवारण, पुरग्रस्तांच्या मदतीसाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी (दि. २६) राज्यस्तरीय विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत दिली. राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी पूर परिस्थितीबाबत सतर्क राहून काम करावे, अशा सूचनाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

राज्यातील अतिवृष्टी, पूरस्थिती व अवर्षण परिस्थितीचा आढावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांकडुन दूरचित्रसंवाद प्रणालीद्वारे घेतला. या वेळी आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, मुख्य सचिव मनोज सौनिक, वित्त विभागाचे अपर मुख्य मुख्य सचिव नितीन करीर, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता, आपत्ती नियंत्रण कक्षाचे संचालक आप्पासो धुळाज, आपत्ती नियंत्रण कक्षाचे उपसचिव डॉ. श्रीनिवास कोतवाल आमदार संजय कुटे उपस्थित होते.

पुरामुळे गावात घरात, रस्त्यावर गाळ साचला असेल तर ते स्वच्छ करण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद मदत निधी तसेच जिल्हा परिषदेतील निधीचा उपयोग करावा. प्रत्येक जिल्ह्याला दिलेला ३० लक्ष रुपयांचा आगाऊ निधी वापरावा. निधी कमी पडल्यास तातडीने निधीची मागणी करण्याची सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

राज्यात अनेक भागात नदी, नाले, ओढ्यात अतिक्रमण झाले आहे. नदी, नाल्यांचा नैसर्गिक प्रवाह अडल्यामुळे पूर परिस्थिती निर्माण होते. अशा ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांनी नदी, नाल्यातील अतिक्रमण काढण्याचे काम प्राधान्याने व कठोर भूमिका घेऊन पार पडावे. नदी, नाल्यातील गाळ काढण्याचे काम करण्यासाठी कंत्राटदारांची यंत्रसामुग्री व प्रशासनाकडून डिझेलची व्यवस्था करावी. १५ सप्टेंबरपर्यंत ही मोहीम पूर्ण करावी, तसेच गाळ काढल्यानंतर तो पुन्हा नदी, नाल्यात जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

दरडप्रवण व पूर परिस्थितीवेळी धोकादायक परिस्थिती असलेल्या भागातील नागरिकांना दुसऱ्या ठिकाणी पुनर्वसन करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी अशा धोकादायक गावांची माहिती सर्वेक्षणाद्वारे एकत्रित करावी. पुनर्वसन करण्यासाठी पर्यायी जागेची व्यवस्था, गावकऱ्यांची उपजिविका या सर्व बाबींचा विचार करून आराखडा तयार करण्याच्या सूचनासद्धा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केल्या.

सुरक्षित स्थळी हलविण्यात यावे. पुरस्थितीमूळे मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या कुटूंबियांना प्रत्येकी चार लाख रुपयांची मदत तातडीने द्यावी. शेतीपिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने सुरू करावेत. रोगराई पसरु नये, याकरिता स्वच्छता करणे, औषध फवारणी करणे यासारख्या प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात. अतिवृष्टीमुळे रस्त्यांची हानी झाल्याने गावांचा संपर्क तुटलेला आहे, अशा रस्त्यांची बांधकाम विभागाने तातडीने दुरुस्ती करावी. पुरामुळे ज्या शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्य खराब झाले आहे, त्यांना शिक्षण विभागाने शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे, आदी सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांना दिल्या.

# बँकांनी कर्ज वाटपाचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करावे -जिल्हाधिकारी डॉ. म्हसे

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शेतकऱ्यांना पिक कर्ज वाटपासोबतच केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनेच्या लाभार्थ्यांना उद्योग व्यवसाय उभारण्यासाठी बँकांकडून कर्ज वितरीत करण्यात येते. शेतकऱ्यांना व लाभार्थ्यांना कर्ज वाटपाचे बँकांना दिलेले उदिष्ट हे निर्धारीत वेळेत पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी दिले.

जिल्हास्तरीय बँकर्स समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी डॉ. म्हसे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी रिझर्व्ह बँकचे जिल्हा विकास अधिकारी नरेंद्र कोकरे, बँक ऑफ इंडिया रायगड विभाग प्रमुख मुकेश कुमार, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक विजयकुमार कुलकर्णी, जिल्हा विकास अधिकारी नाबार्ड प्रदीप अपसुंदे, जिल्हा उद्योग केंद्रचे महाव्यवस्थापक जी. एस. हरल्या, रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे सीईओ मंदार वर्तक, विविध महामंडळाचे अधिकारी, सर्व बँकेचे जिल्हा प्रतिनिधींची प्रमुख उपस्थिती होती.

ज्या बँकांचे पिक कर्जवाटपाचे प्रमाण ७५ टक्केपेक्षा कमी आहे, त्या बँकांवर कायदेशीर कारवाही करण्याचा इशारा जिल्हाधिकारी यांनी बँकांना दिला. प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाची उद्योग उभारण्यासाठीची जास्तीत जास्त



प्रकरणे जिल्हा उद्योग केंद्राने बँकांकडे पाठवावी. बँकांनी विविध व्यवसायासाठी वेळेत अर्जदाराला कर्ज उपलब्ध करून द्यावे.

शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत बँकांकडे असलेली कर्ज प्रकरणे तातडीने मंजूर करावी. त्यामुळे या उपक्रमांतर्गत लाभार्थ्यांना कर्ज योजनांचा लाभ देण्यात येईल. यंत्रणांनी त्यांच्या विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्याकडून कागदपत्रांची पुर्तता करून त्यांना व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी प्रकरणे बँकांकडे सादर करावी. त्यामुळे बँका ती प्रकरणे तातडीने मंजूर करतील आणि संबंधित अर्जदाराला योग्य वेळी आपला व्यवसाय सुरू करता येईल. बँकांनी संवेदनशील होऊन त्यांच्याकडे असलेली विविध केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची कर्ज प्रकरणे तातडीने मंजूर करावी, असे त्यांनी सांगितले.

जिल्ह्याच्या विकासात बँकांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याने उद्योग व्यवसाय उभारणीसाठी बँकांकडे असलेली कर्ज प्रकरणे वेळीच मंजूर करावी.

बँकांनी यंत्रणांच्या प्रस्तावाबाबत पाठपुरावा करतांना त्यांना प्रतिसाद द्यावा. कर्जप्रकरणे मंजूर करण्यास बँकांनी चालढकल केल्यास संबंधित बँक अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल, तसेच विविध महामंडळाने आपली कर्ज प्रकरणे मंजूर करण्यासाठी बँकांकडे सातत्याने पाठपुरावा करावा, असे ते म्हणाले. या वेळी २०२३-२४ सालासाठी ६४५० कोटी रु. वाटपाचे उद्दीष्ट असलेले पुस्तिकाचे अनावरण जिल्हाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

# मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची इर्शाळवाडीच्या निवारा केंद्राला भेट

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बी. एन. बास्टेवाड यांनी सोमवारी खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी या दरडग्रस्तांचे पुर्नवसन करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवारा केंद्राला भेट देत पाहणी केली. या वेळी दुर्घटनाग्रस्त नागरिकांसोबत संवाद साधत त्यांना धीर दिला, तसेच या ठिकाणी जिल्हा परिषद प्रशासनाकडून करण्यात आलेल्या कामांची पाहणी करीत संबंधितांना आवश्यक त्या सूचना केल्या.

दरडग्रस्त इरसालवाडी ग्रामस्थांचे जुन्या मुंबई-पुणे महामार्गाजवळ चौक परिसरात तात्पुरते पूर्नवसन करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेमार्फत याठिकाणी १४ स्ट्रीटलाईट, नळ कनेक्शन, गटार व्यवस्था, बाथरूम, अंतर्गत रस्त्यांची



कामे करण्यात आली आहेत. या कामांची त्यांनी पाहणी केली. बास्टेवाड यांनी लहान बालके, विद्यार्थी, अनाथ झालेली बालके यांचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. दुर्घटनाग्रस्त बालके शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत यासाठी त्वरित उपाययोजना करण्याचे निर्देश दिले, तसेच यानंतर दरडग्रस्त इरसालवाडी ग्रामस्थांचे ज्या ठिकाणी कायमस्वरूपी पूनर्वसन करण्यात येणार आहे, त्या जागेची पाहणी केली.

खालापूर पंचायत समिती प्रभारी गटविकास अधिकारी सी. एस. राजपूत, विस्तार अधिकारी एम. डी. शिंदे, शैलेश तांडेल यांच्यासह पंचायत समिती स्थरावरील पाणीपुरवठा, आरोग्य, बांधकाम विभागासह इतर विभागातील अधिकारी उपस्थित होते.

# पॅथॉलॉजी लॅब नोंदणीबाबत धोरण ठरवणार -ना. तानाजी सावंत

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील पॅथॉलॉजी लॅब नोंदणीबाबत धोरण ठरवण्यासाठी आरोग्य विभागाचे अतिरिक्त सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येणार आहे, असे आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी विधान परिषदेत बुधवारी (दि. २६) सांगितले.

आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत म्हणाले की, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वैद्य योगेश माहिमकर हे मागील १८ ते १९ वर्षांपासून बाह्यरुग्ण विभागांतर्गत आयुर्वेदिक प्रॅक्टीस करीत आहेत. त्यांनी एकाच मधुमेही रुग्णाचे रक्तनमुने सांगलीतील चार वेगवेगळ्या नामांकित लॅबमध्ये पाठवले आणि त्या चारही लॅबमधील रिपोर्टमध्ये खूप मोठी तफावत दिसून येत असल्याची व्हिडिओ क्लिप व्हायरल केली आहे, परंतु त्यासंबंधी कोणत्याही आस्थापनांकडे प्रकारची लेखी तक्रार केली नाही. त्यामुळे या विषयाबाबत चौकशी करण्यात आलेली नव्हती, मात्र हे प्रकरण नागरिकांच्या जीविताशी निगडित असल्याने चौकशी करण्यासाठी एक समिती नेमून यामध्ये दोषी असणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याबाबत सूचना देण्यात येतील.आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत म्हणाले की, सद्यस्थितीत पॅथॉलॉजी लॅब रजिस्ट्रेशनचा कोणताही कायदा राज्यामध्ये लागू नाही. त्यामुळे प्रयोगशाळांची नोंदणी राज्यातील कोणत्याही आस्थापनेमध्ये होत नाही. राज्यातील सर्व पॅथॉलॉजी लॅब नोंदणीबाबत धोरण ठरवण्यासाठी आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येणार आहे. त्यानुसार त्याबाबत एक निश्चित नियमावली तयार करण्यात येईल.

या लक्षवेधीच्या चर्चेत विधान परिषद सदस्य आमदार प्रवीण दरेकर, भाई गिरकर, भाई जगताप, ॲड. अनिल परब यांनी सहभाग घेतला.

# जिल्हाधिकारी कार्यालयात कारगिल विजय दिवसानिमित्त आदरांजली अर्पण

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**


जिल्हाधिकारी कार्यालय राजस्व सभागृहामध्ये बुधवारी (दि. २६)कारगिल विजय दिवस जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी लेफ्टनंट कर्नल वैजनाथ माने यांचे उपस्थितीत साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन व शहिदअमर जवान प्रतिमेस फुले वाहून श्रद्धांजली अर्पण केली. या वेळी सर्व उपस्थितांनी स्तब्धता पाळून आदरांजली वाहिली. कार्यक्रमास शहीद जवान निलेश तुणतुणे यांची वीर माता, वीर पिता यांचा शाल, श्रीफळ तसेच साडी देऊन सन्मान करण्यात आला.

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे श्री गोविंदराव मारुती साळुंखे, सहाय्यक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी कारगिल युद्धाविषयी थोडक्यात माहिती सांगितली.

ले. कर्नल राहुल बैजनाथ माने यांनी कारगिल युद्ध तसेच भारतीय सेनेविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमास सुबेदार नरेश रामचंद्र पवार आपल्या परिवारासह, विधवा, माजी सैनिक, माजी सैनिक विधवा व आजी सैनिक उपस्थित होते. त्यांनी कार्यक्रमामध्ये तरुण मुलामुलींना सैन्यामध्ये भरती होणेबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास शासकिय अधिकारी, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.





पान १ वरून

## न्हावे गावासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार -लोकनेते रामशेठ ठाकूर

मंजुषा ठाकूर, माजी अध्यक्ष किशोर घरत, संजय ठाकूर, चंद्रकांत पाटील, रंजना घरत, कमलाबाई म्हात्रे, सुशीला पाटील, राकेश पाटील, राजेश म्हात्रे, नवनाथ म्हात्रे, भुषण भोईर, आर. ए. म्हात्रे, बाळुशेठ भोईर, किशोर भोईर, गायकवाड गुरुजी, प्रकाश कडू, राजेश घरत, उत्तम म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गावातील विकास कामांसाठी ४० लाख रुपयांची मदत केल्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले.

## रायगडातील २० गावांचे होणार पुनर्वसन

यात जिल्ह्यातील १०३ गावे दरडप्रवण क्षेत्रात असल्याची बाब समोर आली होती. यात २० गावांना दरडींचा अतिधोका असल्याचे नमूद करण्यात आले होते. इर्शाळवाडीतील घटनेनंतर या २० गावांमधील लोकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतरण करण्यात आले आहे. प्रत्येक गावांसाठी एक नोडल ऑफीसरची नियुक्ती करण्यात आली आहे. वावा, आमशेत, लोअर तुडील, टोळ खुर्द, शिंगारकोड मोरेवाडी, आंबिवली बुद्रुक पटेरेवाडी (महाड), सुभाषनगर (खालापूर) अतिधोकादायक गावे आहेत. मुद्रे बुद्रुक, कोंडीवते, बागमांडले, कोंडवी मराठवाडी, कोतवाल खुर्द, मुठवली, तिसे, सोनघर, चांढवे खुर्द, वालुंजवाडी, सव, रोहण, कोथेरी जंगमवाडी (सर्व तालुका महाड) धोकादायक गावे आहेत.

## उरणकरांनी घेतला औषधी रानभाज्यांचा आस्वाद

या महोत्सवात उरण नायब तहसीलदार जी. बी. धुमाळ, उपविभागीय कृषी अधिकारी एन. व्ही. फुलसुंदर, उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर, उरण कृषी मंडळ अधिकारी किसन शिगवण आणि उरण, अलिबाग, पेण, खालापूर, कर्जत येथील शेतकरी, आदिवासी सहभागी झाले होते.

# नवी मुंबईमध्ये कारगिल विजय दिनानिमित्त शहीदांना आदरांजली

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील कोपरखैरणे येथे २४वा कारगिल विजय दिवस बुधवारी (दि. २६) कारगिल युद्धामध्ये शहीद जवानांना या वेळी आदरांजली वाहण्यात आली.

भाजपचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमास माजी नगरसेवक केशव म्हात्रे माजी नगरसेवक शंकर मोरे, माजी नगरसेवक लीलाधर नाईक, दाजी सणस, समाजसेवक नारायण शिंदे, संदीप म्हात्रे, रॉबिन मढवी,



सुनिकेत हांडे-पाटील, माजी सैनिक सर्वश्री सुहास मुळे अंकुश बढे विजय मोरे देवानंद पाटील, प्राचार्य प्रताप महाडिक, समन्वयक नरेंद्र म्हात्रे, मुख्याध्यापक रवींद्र पाटील, एनसीसी आणि एनएसएसचे विद्यार्थी उपस्थित होते.

निवृत्त सैनिक देवानंद पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त करताना, सैनिक आपले कर्तव्य पार पडत असतो. तो कर्तव्याचे उदात्तीकरण करत नाही. नागरिकांच्या मनात सैनिका बद्दल आदरभाव असणे हे आमच्यासाठी समाधानाची बाब असल्याचे ते म्हणाले, तर माजी सैनिक विजय मोरे, अंकुश बढे आणि सुहास मुळे या माजी सैनिकांनी एनसीसी कॅडेट आणि युवकांना सैन्यामध्ये भरती होण्याचे आवाहन केले.

समीक्षा झाल्टे या कॅडेटने एनसीसीच्या माध्यमातून देशसेवेत योगदान देणे अभिमानास्पद असल्याचे नमूद केले, तर संजीवनी कोरडे या कॅडेटने सैन्यामध्ये भरती होण्याची इच्छा व्यक्त करून कारगिल विजय दिवससारख्या समारंभातून प्रेरणा मिळते, असे सांगितले.

# पनवेलमधील ८१ गावांवर 'सीसीटीव्ही'चा वॉच

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी दिलेल्या निर्देशानुसार पनवेल तालुक्यातील जवळपास ८१ गावांमध्ये पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांना लोकसहभागातून सीसीटीव्ही बसवून घेण्यात यश आले आहे. त्यामुळे आता या गावांमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने कायदा सुव्यवस्था अबाधित राहण्यास मदत मिळणार आहे.



पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीमध्ये ३३ ग्रामपंचायत असून त्यामध्ये ८१ गावांचा समावेश आहे. या गावांमधील बहुतांश परिसर हा डोंगराळ भाग तसेच निर्जन असल्याने या ठिकाणी प्रवासी वाहतुक ही कमी प्रमाणात होते. त्यामुळे समाजकंटक हे गैरकृत्य करण्यासाठी व स्वताचे अस्तित्व लपविण्यासाठी या ठिकाणांचा वापर करतात व गंभीर स्वरुपाच्या घटना घडतात. त्यामुळे पोलीसांना गुन्हयाच्या तपासामध्ये अधिक पराकाष्ठा करावी लागते. ही बाब नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांना लक्षात येताच त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील सर्व गावांमध्ये लोकसहभागातून सीसीटीव्ही बसवून घेण्याची सूचना दिली होती.

यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांनी सर्व गावांमधील सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य, प्रतिष्ठित व्यक्ती यांची बैठक घेऊन सीसीटीव्हीचे महत्त्व पटवून दिले. तसेच त्यांच्याकडून सर्व गावांमध्ये लोकसहभागातून सीसीटीव्ही बसवून घेण्याचे आवाहन केले. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत जवळपास सर्वच गावांनी आपल्या हद्दीत सीसीटीव्ही बसवून घेतले आहे.

आता गुन्हयाच्या तपासकार्यात पोलीसांना योग्य ते सहकार्य मिळेल तसेच गंभीर (संभाव्य) स्वरुपाच्या घटनांना प्रतिबंध होऊन कायदा सुव्यवस्था अबाधित राहण्यास मदत मिळणार आहे.

# शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी पंतप्रधान किसान सुविधा केंद्र

## जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांची माहिती; आज पंतप्रधान मोदींच्या हस्ते लोकार्पण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी बी–बियाणे, औषधे, औजारे, खते यांच्या खरेदीसाठी वेगवेगळ्या दुकानात जावे लागते. पंतप्रधान किसान सुविधा केंद्र ही योजना शेतकऱ्यांना या सर्व सेवा सुविधा एकाच ठिकाणाहून पुरविण्यासाठी सुरू करण्यात येत आहे. एकाच ठिकाणी बी–बियाणे, औषधे, औजारे, खते उपलब्ध झाल्यामुळे त्यांची धावपळ वाचणार आहे. सध्या तालुका, प्रांत, ब्लॉक, खेडेगांव पातळीवर खतांची किरकोळ विक्री करणारी (रिटेल शॉप) केंद्रे आहेत. त्याचे रूपांतर आता वन स्टॉप शॉपमध्ये होणार आहे, आणि या केंद्राचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २७) राजस्थान येथे होणाऱ्या सोहळ्यातून करणार असल्याची माहिती भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी पत्रकारांशी संवाद करताना दिली.

त्यांनी पुढे माहिती देताना पंतप्रधान किसान समृद्धी केंद्रांची उद्दिष्टे सांगितले. यामध्ये शेतक–यांना दर्जेदार बी–बियाणे,






औषधे, खते, किटक नाशके हे एकाच ठिकाणी रास्त दरात उपलब्ध करून देणे, शेतक–यांना माती, बियाणे, आणि खतांच्या चाचणीची सुविधा उपलब्ध करून देणे. किंवा जेथे चाचणी सुविधा उपलब्ध आहे. त्या केंद्रांशी शेतकऱ्यांना जोडून देणे, शेतकऱ्यांना लागणाऱ्या अन्य सेवा विक्री पध्दतीने किंवा कस्टम हायरींग सेंटर द्वारे उपलब्ध करून देणे. शेतकऱ्यांना विविध गोष्टींबाबत माहिती पुरविणे, केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरी कल्याणाच्या योजनांची माहिती देणे, खते, औषधे, किटक नाशके यांचा मागणीनुसार पुरवठा होईल, टंचाई निर्माण होणार नाही, याची काळजी घेणे असे असल्याचे नमूद केले. देश भरात जिल्हा, तालुका आणि खेडेगाव पातळीवर खतांची किरकोळ विक्री करणारी दोन लाख ८० हजार दुकाने आहेत. या खत विक्री दुकानांचे किसान सुविधा केंद्रांमध्ये टप्प्या–टप्प्याने रूपांतर करण्यात येणार आहे. उत्तर रायगड क्षेत्रात असलेल्या पनवेलमध्ये १८, उरणमध्ये ०४, खालापूरमध्ये ११ तर कर्जत तालुक्यात २४ अशी एकूण ५७ केंद्र असल्याचीही त्यांनी माहिती दिली.

शेतीमध्ये करता येवू शकणाऱ्या वेगवेगळ्या प्रयोगांची माहिती शेतकऱ्यांना मिळाली पाहिजे यासाठी शेतीमध्ये वापरण्यासाठी उपलब्ध झालेले नवे तंत्रज्ञान, यंत्रसामग्री, पिके, खते, शेतक–यांच्या यशोगाथा याची माहितीही फिल्मद्वारे स्मार्ट टिव्हीतून शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी केंद्रांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर असणार आहे. या सर्व सुविधा स्थानिक भाषेत उपलब्ध असणार आहेत. त्याचबरोबर किसान सुविधा केंद्राच्या परिसरातील शेतकऱ्यांना परस्परांशी वेगवेगळ्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी किसान की बातच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे.

सद्या देशभरातील एक लाखाहून अधिक खत विक्री केंद्रांचे रूपांतर पंतप्रधान किसान समृद्धी केंद्रांमध्ये करण्यात आले असून उर्वरित एक लाख ८० हजार खत विक्री दुकानांचे रूपांतर या वर्षअखेरीस किसान समृद्धी केंद्रांमध्ये करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी दिली.

# हेटवणे धरण ८० टक्के भरले

## पाणी समस्या दूर होण्याचा मार्गावर

**पनवेल : वार्ताहर**

सिडकोच्या क्षेत्रातील खारघर, उलवे, तळोजा, द्रोणागिरी, आदि वसाहती मध्ये पाणी पुरवठा करणाऱ्या हेटवणे धरणातील पाणी साठा ८०.२० टक्क्यांवर पोहचला आहे. त्यामुळे सिडको वसाहती मधील पाणी समस्या दूर होण्याचा मार्गावर आहे.

सिडकोच्या हेटवणे धरणात १२ जुलैपर्यंत शंभर दिवस पुरेल एवढा पाणी साठा होता. यावर्षी उशीरा पावसाला सुरुवात झाली आहे. जून महिन्यात धरण क्षेत्रात अपेक्षित पाणी पाऊस पडलेला नाही. त्यामुळे सिडकोने जून महिन्यापासून १५ टक्के पाणी कपात केली होती. यावर्षी पावसाळा उशिराने सुरू झाल्यामुळे आणि पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे धरण भरेल की नाही? अशी चिंता सिडको आणि वसाहतमधील रहिवाशांना होती. मात्र, १२ दिवसात पेण रायगड परिसरात झालेल्या झालेल्या मुसळधार पावसामुळे पाणी साठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. पावसामुळे हेटवणे धरणात मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक सुरू आहे. २५ जुलैपर्यंत धरणात पाणीसाठा ८०.२० टक्के इतका झाला आहे. त्यामुळे रहिवाशांमध्ये आणि सिडको अधिकाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हेटवणे धरणाची पाणी साठवण्याची क्षमता १४७.४९ दशलक्ष घनमीटर असून २३ जुलै पर्यंत ११३ दशलक्ष घनमीटर पाणी साठा झाला आहे. पुढील काही दिवसात नियमिपणे पाऊस सुरू राहिल्यास हेटवणे धरण शंभर टक्के भरेल, असे सिडकोच्या पाणीपुरवठा विभागामध्ये कार्यरत कर्मचाऱ्याकडून समजले दरम्यान, हेटवणे धरणात कमी पाणी साठा असल्यामुळे आणि धरणात शंभर दिवस पाणी पुरेल एवढा पाणी साठा असल्यामुळे सिडकोने आपल्या हद्दीतील वसाहतीत १५ टक्के पाणी कपात केली होती, मात्र सद्यस्थितीत ८०.२० टक्के पाणीसाठा पोहचले आहे. त्यामुळे सिडकोकडून कपात केलेला पाणी साठा पूर्ववत करण्यात यावा, अशी मागणी सिडको वसाहत मधील नागरिकांकडून केली जात आहे.

# दरड कोसळल्याचे कळताच पाहणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील धोदाणी गावातील ग्रामस्थांनी दरड कोसळल्याने मोठ्याने आवाज येत असल्याची माहिती २५ जुलैला ग्रामस्थांनी पनवेल प्रशासनाला देताच उपजिल्हा अधिकारी राहुल मुंडके यांनी स्वतः कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल होऊन परिस्थिती पाहणी केली. या वेळी उपविभागीय अधिकारी मुंडके यांनी ग्रामस्थांना भिती आणि अफवेपोटी पळापळ न करण्याचा सल्ला दिला. दरडप्रवण क्षेत्रात एकाच वेळी सर्वांना संपर्क साधला जाईल अशी यंत्रणा येथे तातडीने कार्यान्वित करण्याचे आश्वासन दिले.

दरडप्रवण क्षेत्रात एकाच वेळी सर्वांना संपर्क साधला जाईल अशी यंत्रणा येथे तातडीने कार्यान्वित करण्याचे आश्वासन दिले. तसेच ग्रामस्थांनी पोलीस व महसूल विभागाला संपर्क केल्यास काही मिनिटात सरकारी मदत केली जाईल असे सांगीतले. दरम्यान, आज सकाळी सुद्धा प्रशासनाने त्या भागाची पाहणी करून योग्य त्या सूचना केल्या आहेत.

# अविनाश कोळी यांचा सत्कार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपच्या उत्तर रायगड जिल्हा अध्यक्षपदी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे सदस्य अविनाश कोळी यांची निवड झाली आहे. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या वतीने सत्कार समारंभ बुधवारी आयोजीत करण्यात आला होता.

या वेळी नवनियुक्त अध्यक्ष अविनाश कोळी यांचा मंचाचे अध्यक्ष माधवराव पाटील यांनी सत्कार केला. पत्रकार संजय कदम, मंदार दोंदे, हरेश साठे, अनिल भोळे, अनिल कुरघोडे, नितीन फडकर, प्रवीण मोहकर, प्रशांत शेडगे, राजेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

दरम्यान, अविनाश कोळी यांना अनेक जण शुभेच्छा देत आहेत.

# पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत २४ जुलैपासून आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये कर पुर्ननिरीक्षण मोहिम सुरू आहे. या मोहीमेला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभत आहे. या मोहिमेमध्ये मालमत्ता धारकांच्या किरकोळ दुरूस्त्या, सदनिका क्रमांकामधील दुरूस्त्या, माजी सैनिक नाव दुरूस्त्या तातडीने करून दिल्या जात आहे.

महापालिका मालमत्ता कर देयकांच्या वसुलीवरती भर देत असून, चालू आर्थिक वर्षामध्ये महापालिकेचा मालमत्ता कर भरण्यास पनवेलकरांचा उत्तम प्रतिसाद दिसून येत आहे. एप्रिल महिन्यापासून ते आजपर्यंत १५८ कोटीहून अधिकचा भरणा महापालिकेच्या तिजोरीमध्ये झाला आहे. मालमत्ता कर हा महापालिकेचा एकमेव आर्थिक स्त्रोत असल्याकारणाने तसेच मा. न्यायालयानेही मालमत्ता कर, वसुलीला स्थगिती दिली नाही. त्यामुळे मालमत्ता कर बिलामधील नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविल्या जाव्या यासाठी आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली २८ जुलैपर्यंत कर पुर्ननिरीक्षण मोहीम सुरू केली आहे. दिलेल्या मुदतीत हरकत न घेतलेल्या मालमत्ता धारकांना नैसर्गिक



न्याय मिळावा या तत्वाने व महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ अंतर्गत कराधान नियमानुसार कर आकारणीत दुरुस्ती, फेरफार करणेची तरतुद असल्याने मालमत्ता धारकांना हरकत अर्ज करण्यासाठीची आणखी एक संधी या मोहिमेच्या माध्यमातून महापालिकेच्या वतीने देण्यात येत आहे.

या मोहिमेला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून पहिल्या दिवशी एकुण ५१, दुसऱ्या दिवशी १११ तर आज तिसऱ्या दिवशी १७५ नागरिकांनी आपल्या बिलामध्ये दूरूस्त्या करून घेतल्या. मालमत्ताधारकांच्या मोजमापाविषयी तक्रारी देखील ताबडतोब सोडविल्या जात आहेत. या वेळी आलेल्या अर्जाची पडताळणी करून मालमत्ता कर विभाग प्रमुख सुनील भोईर, लिपिक महेश गायकवाड आणि कर्मचारी हे तातडीने दुरूस्ती करून देत आहेत.मालमत्तताधारकांनी आपल्या मालमत्ता बिलाबाबतचे आक्षेप अर्ज व आपल्या कागदपत्रासहित २८ जुलैपर्यंत आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे सकाळी १०:३० ते ०१:३० या वेळेत सादर करावेत, असे आवाहन उपायुक्त गणेश शेटे यांनी केले आहे. या ठिकाणी मालमत्ता कर पुर्ननिरीक्षण मोहिमेंतर्गत बिलामधील विविध दुरूस्त्यासाठी खास पथकांचे नियोजन करण्यात आले आहे. संबधित पथकातील कर्मचारी मालमत्ताधारकांची हरकत लक्षात घेऊन तत्काळ बिलामध्ये दुरूस्ती करून देत आहेत.

या मोहिमेअंतर्गत किरकोळ दुरुस्ती करण्यात आलेल्या मालमत्ता धारकांनी महापालिका मार्फत राबविण्यात आलेल्या पुर्न निरिक्षण मोहीमेचे स्वागत केले आहे. त्याचबरोबर महापालिकेच्या पुर्न निरिक्षण मोहीमेबाबत मालमत्ताधारकांनी समाधान व्यक्त केले असून, मालमत्ता करासंदर्भातील पेंडीगची कामेदेखील कर विभागाच्यावतीने संपवण्यावरती भर दिला जात आहे. मालमत्ता करांसंदर्भातील समस्यांचे निराकरण झाल्याने नागरिक महापालिकने मालमत्ता कर भरण्यासाठी विकसित केलेल्या 'PMC TAX APP' मोबाईल अॅप तसेच क्यु आर कोडचा वापर मोठ्या प्रमाणात करत आहेत.

**माझी मालमत्ताकराच्या बिलाबद्दल तक्रार होती, कर उपायुक्त व विभागातील कर्मचाऱ्यांनी तत्परतेने तक्रारीचे निवारण केले. कर विभागातील टिम खूप चांगले काम करत असून व्यवस्थीत मार्गदर्शन करत आहे. मी सर्वांचे आभार मानतो.**

**–डॉ. सचिन मुराडे, चिरायु हॉस्पीटल, खांदा कॉलनी**

**माझ्या मालमत्ता कराच्या बिलात नावामध्ये बदल करायचा होता. नाट्यगृहातील पालिकेच्या कर विभागाच्या वतीने सुरू असलेल्या मोहिमेमध्ये कर्मचाऱ्यांनी माझी तक्रार ऐकून घेऊन तात्काळ माझ्या बिलात दुरूस्ती करून दिली. माझे काम जलदरित्या केल्याबद्दल महापालिकेचा मी आभारी आहे.**

**–मारूती मेटकरी, मालमत्ताधारक, पनवेल**

# वीर वाजेकर महाविद्यालयात सैन्य, सुरक्षा नोकर भरतीची कार्यशाळा

**उरण : वार्ताहर**

उरणमधील वीर वाजेकर महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेल व करीयर गायडंस सेल व रायगचा युवक फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने कारगिल विजय दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी सैन्य व सुरक्षा नोकर भरतीचे कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले होते.

कारगिल विजयातील शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख प्लेसमेंट सेलचे चेअरमन डॉ. आमोद



ठक्कर यांनी केले. उद्घाटन नवी मुंबई पोलीस असिस्टंट कमिशनर सुनील बोंडे यांनी केले. प्रमुख पाहुणे रायगड भुषण जयपाल पाटील यांनी सैन्य भरती, पोलीस, बी. एस. एफ., सी आए एस एफ ईत्यादी नोकरीच्या संधी व त्या साठी आवश्यक गुणवत्ता, त्यासाठी लागणारे प्रशिक्षण ह्याची सखोल माहिती दिली. तसेच आपत्ती व्यवस्थापन व त्याची आवश्यकता ह्याचे सविस्तर विश्लेषण केले. प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांनी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमात ध्यैय पुरती साठी आत्मीक सद्रुढतचे महत्त्व प्रजापती ब्रह्मा कुमारीच्या संचालीका तारा दिदी यांनी सांगितले. या प्रसंगी भारतीय संविधानाचे सामूहिकरित्या वाचन करण्यात आले. उपप्राचार्य डॉ. विलास महाले यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी नियोजन प्रा. पंकज भोये, प्रा. भूषण ठाकूर, प्रा. संतोष देसाई व प्रा. कांबळे राजकुमार यांनी केले. सूत्रसंचालन दीक्षिता म्हात्रे यांनी केले.

# रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये पर्यावरणविषयक उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य शास्त्र महाविद्यालयात बुधवारी (दि. २६) वनस्पतीशास्त्र विभागातर्फे 'बनवा बीज गोळे, धराही ही फळफळे' हा पर्यावरण विषयक उपक्रम घेण्यात आला.

जमिनीतली पाण्याची पातळी दिवसेंदिवस कमी होत असून तापमानात झपाट्याने वाढ होत आहे याचा विचार करून वनस्पती शास्त्र विभागातील द्वितीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनीनी त्यावर एकमेव उपाय म्हणून झाडे लावण्यासाठी व बिजांचे गोळे तयार करून ते आसपासच्या परिसरात फेकले व आनंद घेतला त्याचा फायदा येणाऱ्या पुढील काळामध्ये धरतीही फळफळेल त्यामध्ये प्रामुख्याने पेरू, पपई अशी फळझाडे, पिंपळ, वड, कडुनिंब आदी झाडांच्या बियांचा समावेश होता. या उपक्रमाचा प्रमुख उद्देश



महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना निसर्गा विषयी प्रेम व वृक्ष लागवडीचे महत्त्व हा होता. हा उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन प्रा. पूजा लांजेकर यांनी केले व शास्त्र शाखेतील इतर प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.



## संपादकीय

# विरोधकांची खेळी

मणिपूरमधील हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर संसदेचे कामकाज सध्या गदारोळात सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या मुद्यावर संसदेत बोलले पाहिजे अशी मागणी करणाऱ्या विरोधकांनी आता सरकारविरोधात अविश्वास प्रस्ताव मांडला आहे. अर्थात विरोधकांच्या अविश्वास ठरावामुळे सरकारला काहीही फरक पडणार नाही.

**मणिपूरमधील हिंसाचाराबद्दल केंद्र सरकार तसेच तेथील राज्य सरकार दोन्हीही गंभीर आहेत. हा हिंसाचार आटोक्यात यावा यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत, तसेच तेथील जनसामान्यांचे जीवन पूर्ववत व्हावे यासाठी मदत पुरवण्याचे प्रयत्नही दोन्ही सरकारांकडून सुरू आहेत. दुसरीकडे विरोधकांकडून मात्र मणिपूरमधील हिंसाचाराचा राजकारणासाठी शक्य तितका वापर करण्याचा जोरदार प्रयत्न सुरू आहे. पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच विरोधकांनी या प्रश्नावरून सातत्याने संसदेत गदारोळ घालण्याचे आपले काम सुरू ठेवले आहे. मणिपूरमधील हिंसाचारावर चर्चा करण्यासाठी सरकार तयार आहे असे उत्तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी यापूर्वीच दिले आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनीही तत्पूर्वी तसे स्पष्ट केले होते, परंतु सत्ताधारी भारतीय जनता पक्षाकडून चर्चेसाठी वारंवार आवाहन केले गेल्यानंतरही विरोधक चर्चेपासून पळ काढतानाच दिसले. या चर्चेची शक्यता हाणून पाडणाऱ्या विरोधकांनी आता सरकारविरोधात अविश्वास ठराव आणण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस आणि भारत राष्ट्र समिती यांनी हा अविश्वास प्रस्ताव दिला असून लोकसभा अध्यक्षांनी तो स्वीकारला आहे. या ठरावावर पुढच्या आठवड्यात चर्चा होण्याची शक्यता आहे. नियमानुसार लोकसभेचा कोणताही खासदार असा प्रस्ताव दाखल करू शकतो. त्याच्याकडे ५० पेक्षा जास्त लोकसभा सदस्यांचा पाठिंबा असेल तर लोकसभा अध्यक्ष चर्चेची वेळ आणि तारीख ठरवतात. दहा दिवसांच्या आत अशा प्रस्तावावर चर्चा होते. सर्वपक्षीय बैठकीत चर्चा करून आपण ही तारीख ठरवू असे यासंदर्भात लोकसभा अध्यक्षांनी म्हटले आहे. मणिपूरमध्ये दोन महिलांची नग्नावस्थेत धिंड काढल्याची घटना दर्शविणारा व्हिडिओ गेल्या आठवड्यात समाजमाध्यमांद्वारे देशभरात पसरल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी लागलीच संसदेच्या प्रांगणात प्रसारमाध्यमांशी बोलताना या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध केला होता व सर्वच राज्यांनी महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भात काळजी घ्यावी, असे म्हटले होते. वास्तवत: मणिपूरमधील हिंसाचार हा अतिशय संवेदनशील विषय असून सरकार त्याविषयी गंभीर आहे व संसदेत चर्चा करण्यासही तयार आहे हे सरकारकडून संसदेत पुन्हा पुन्हा स्पष्ट करण्यात आले. मणिपूरमधील महिला अत्याचाराच्या घटनांचा राजकारणासाठी वापर करू नका असे आवाहनही सरकारकडून विरोधकांना करण्यात आले, परंतु लोकसभा निवडणुकीला वर्षभराहून कमी कालावधी उरलेला असल्याने विरोधक सध्या सत्ताधारी भाजपला विरोध करण्याची कुठलीही संधी दवडण्यास तयार नाहीत. त्यातच मंगळवारी पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांच्या 'इंडिया' आघाडीवर जोरदार टीका केल्याने विरोधक अधिकच खवळलेले दिसतात. ब्रिटिशांच्या ईस्ट इंडिया कंपनीपासून इंडियन मुजाहिद्दीन व पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया अशा दहशतवादी संघटनांपर्यंत अनेकांनी आपल्या नावात 'इंडिया' हा शब्द ठेवला आहे असे म्हणत 'इंडिया' हे नाव धारण करून विरोधक लोकांची दिशाभूल करत आहेत, ही मोदींनी केलेली टीका विरोधकांना चांगलीच झोंबली असावी. त्यामुळेच मणिपूर प्रश्नावरून मोदींना संसदेत घेरण्यासाठी त्यांनी आता अविश्वास ठरावाची खेळी खेळली आहे. जगभरातील मोठे देश भारतातील विद्यमान नेतृत्वाशी आदराने वागत असताना, दुर्दैवाने विरोधक मात्र भारतविरोधी परकीय शक्तींचे फावेल असे राजकारण करण्यात मशगुल आहेत.**

# पूनर्वसनाचा प्रश्न कायमस्वरूपी मिटविण्याची गरज



## खबरबात
**शैलेश पालकर**

महाड तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त व दरडग्रस्तांना तत्कालीन आमदार माणिकराव जगताप यांचे पुनर्वसनकामी तब्बल ४८ सरकारी परिपत्रकांमध्ये बदल केल्याने अभ्यासपूर्ण प्रयत्न यशस्वी झाले. याचे कौतुक दरडग्रस्तांना घरकुलांचा ताबा देताना तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी तत्कालीन आमदार माणिकराव जगताप यांनी यशस्वीरित्या समाजसेवी संस्थांच्या मदतीने राबविलेल्या 'देशास आदर्शवत् पुनर्वसनाचा महाड पॅटर्न' असे संबोधिले, मात्र पोलादपूर तालुक्यातील कोंढवी व कोतवाल येथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचे प्रयत्न कुचकामी ठरल्याने हे कौतुकाचे बोल दूषणांमध्ये बदलले आहे.

पोलादपूर तालुक्यातील कोंढवी आणि कोतवाल येथे सिध्दीविनायक ट्रस्टच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या पुनर्वसन संकूलाचा ताबा दरडग्रस्तांना लॉटरीद्वारे देण्यात आला आहे, मात्र तेथे दरडग्रस्तांना मूलभूत सुविधा उपलब्ध करण्यापूर्वीच या संकुलांचा जिर्णोध्दार करण्याची वेळ येऊन ठेपली. त्यामुळे पोलादपूर तालुका सिध्दीविनायक ट्रस्टच्या मदतीचा योग्य विनियोग न झाल्याने पुनर्वसनास वंचित राहिला आहे, मात्र सध्या या जिर्णावस्थेत असलेल्या दोन्ही पुनर्वसन संकुलांच्या इमारत सरकार आणि आपद्ग्रस्तांच्या कोत्या मानसिकतेचे द्योतक म्हणून उभ्या आहेत. २५ व २६ जुलै २००५ रोजी या दोन्ही गावांमध्ये भूस्खलनामुळे दरडग्रस्त झालेल्यांसाठीच्या पुनर्वसन संकुलात न राहता दरडप्रवण क्षेत्रातच अद्याप दरडग्रस्त राहात आहेत. त्यामुळे २०२१ वर्षी देवळे ग्रुपग्रामपंचायतीच्या हद्दीतील केवनाळे आणि साखर ग्रामपंचायतीच्या हद्दीतील सुतारवाडीतील दरडग्रस्तांच्या पुनर्वसन संकुलांचे पुढे काय होणार, याची केवळ भाकितं करणेच योग्य ठरणार आहे. साखर सुतारवाडी येथील पुर्णत: १२ घरे आणि अंशत: १० घरे बाधित असताना एकूण ३८ घरे आणि ४४ कुटूंबे यांचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. देवळे ग्रुपग्रामपंचायतीच्या हद्दीतील केवनाळे येथे पूर्णत: ७ आणि अंशत: १० घरे बाधित झाली असताना ११४ केवनाळे, ३५ आंबेमाची आणि १४ बौध्दवाडी या एकूण १२८ घरांचे पुनर्वसन करण्याकामी सक्तीने भुसंपादन करण्याचा प्रस्ताव करण्यात आल्याने याच गावातील काहींच्या जमिनींवर सरकारी आदेशाची विज कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे, मात्र गोडी अपूर्णतेची तब्बल दोन वर्षांनंतरही कायम असून सरकारी अधिकारी केवळ आदेश आणि प्रस्ताव करण्याच्या खेळात बदली होऊन गेल्यानंतर चुकीचे आदेश पारित करून घेणाऱ्या आणि हेतुपुरस्सर कोसळलेल्या एका छप्पराचे अ,ब,क,ड असे ॲसेसमेंटचे उतारे करणाऱ्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांमुळे आणि एका इमारतीची चार घरे असा पंचनामे करून मोठ्या प्रमाणात शासनाची दिशाभूल करणाऱ्या तलाठयामुळे पुनर्वसनाचे काम रखडणार हे निश्चित झाले आहे.

पोलादपूर तालुक्यातील २००५ मध्ये पुनर्वसनाच्या पहिल्या टप्प्यात बोरावळे येथील नऊ घरांच्या बांधकामानंतर तेथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन पूर्ण झाले. सावित्री महिला विकास संस्थेतर्फे पैठण गांवात ३, देवपूर येथे ४, पार्ले येथे ३, माटवण येथे ५, पोलादपूर– जोगेश्वरी गाडीतळ येथे ३, सडवली येथे ६, लोहारमाळ येथे ४, रानबाजिरे येथे २३, आड येथे २, सवाद येथे १ आणि हावरे येथे ६ अशी एकूण ६१ घरकुले बांधण्यात येऊन ताबाही देण्यात आला.

पोलादपूर येथील चित्रे यांना घरबांधणीसाठी सरकारी अनुदान देण्यात आले. कोतवाल खुर्द आणि बुद्रुकच्या दरडग्रस्तांसाठी २८ घरकुलं उभी राहतील एवढे क्षेत्र एवढे क्षेत्र उपलब्ध करण्यात येऊन पुनर्वसनाचे प्रयत्न सरकारकडून सुरू झाले. सिध्दीविनायक ट्रस्ट, मुंबईने याकामी खर्चाची जबाबदारी उचलली. कोतवालमध्ये दरडग्रस्तांची संख्या ४८ असताना येथे ४५ लाख रूपये खर्चातून केवळ १५ घरकुलं उभारण्यात आली. कोतवाल खुर्द येथे १० डिसेंबर २००७ रोजी तांत्रिक मान्यता किंमत ४९ लाख २१ हजार ४३४ रूपये असून दरसूचीमध्ये झालेल्या वाढीमुळे निविदेची किंमत २३.५० टक्के अधिक वाढल्यामुळे १० लाख ६४ हजार ८१ रूपये खर्चातील अधिक वाढहोणार आहे. त्यानुसार कोतवाल खुर्द येथील एका घरकुलासाठी ३ लाख ४५ हजार ७९० रूपये ७५ पैसे खर्च झाल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त झाली आहे. कोंढवी येथे ७८ कुटूंबे दरडग्रस्त असताना याठिकाणी प्रत्येकी ५० लाख रूपये खर्चातून केवळ १५ घरकुलं उभारण्यात आली. कोंढवीमध्ये केवळ २९ पात्र दरडग्रस्त असल्याचे निश्चित करण्यात आले आहे. कोंढवी येथे तांत्रिक मान्यता किंमत ४९ लाख ४९ हजार ६५१ रूपये एवढी असून दरसूचीमध्ये झालेल्या वाढीमुळे निविदेची किंमत २३.५० टक्के अधिक वाढल्यामुळे कोंढवीतील एका घरकुलासाठी ३ लाख २० हजार ८७५ रूपये ९५ पैसे खर्च झाल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे म्हणणे आहे. सिध्दीविनायक ट्रस्टच्या माध्यमातून तब्बल एक कोटी रूपयांच्या निधीमधून बांधण्यात आलेली ही ३० घरकुले कोतवाल खुर्द व कोंढवी येथे बांधण्यात आल्यानंतर कोंढवी येथील घरकुलांच्या वाटपाची सोडत काढण्यासाठी २५ फेब्रुवारी २०११ रोजी झालेल्या विशेष ग्रामसभेमध्ये वाटप झालेल्या १५ दरडग्रस्त लाभाथाअपैकी गंगाराम काळू यादव उर्फ धोत्रे हाच एकमेव येथे वास्तव्यास आहे.



साखर सुतारवाडी येथे ६ तर केवनाळे येथे ५ जणांचे बळी दरडीखाली गेले. यापैकी केवनाळे गावाचा जिऑलॉजिकल सर्व्हे अहवाल वर्ग १ मध्ये आला आहे. जिऑलॉजिकल सर्व्हेचा अहवाल प्राप्त झाला नसलेल्या आंबेमाचीतील लोक स्थलांतरीत होण्यासाठी विरोध करीत असताना तेथील फार्महाऊसचेही स्थलांतर केले जाणार काय, हा अनुत्तरित प्रश्न ग्रामस्थांना भेडसावणारा आहे. तालुक्यातील दाभिळ, हळदुळे, चिरेखिंड, वाकण धामणेची वाडी, कुडपण खुर्द व कुडपण बुद्रुक, किनेश्वर, खोपड, चांदके अशा सुमारे १८ गांवांमध्ये दरडीचा धोका निर्माण झाला असताना मोठी लोकसंख्या दरडप्रवण क्षेत्रामध्ये वास्तव्य करीत असल्याने पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशावेळी, दरडग्रस्तांचे मसिहा बनण्याची मानसिकता काही राजकीय नेतृत्वामध्ये तयार झाली असताना सरकार आणि जनतेतील दुवा बनण्याऐवजी गोष्टीतील दोन माकडांच्या भांडणात खवा फस्त करणाऱ्या बोक्यासारखे वर्तन होण्याआधी जनता आणि सरकारने आपसात माकडांसारखी ओढाताण न करता समन्वय करण्याची गरज निर्माण झाली आहे. एका बाधिताला चार घरे देण्याचा आभास निर्माण करून बाधितांना या आमिषाला भुलविण्याचा प्रयत्न राजकीय पक्षांना मतांच्या बेगमीसह बाधितांचा प्रचंड पाठिंबा प्राप्त करण्याची संधीही ठरली होती. आताही दरडग्रस्त झालेल्या साखर सुतारवाडी आणि देवळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील केवनाळे गावातील पुनर्वसनाला आगामी रायगड जिल्हा परिषद आणि पोलादपूर पंचायत समितीच्या निवडणुककामांचा राजकीय खोडा बसण्याची चिन्हे दिसून येत आहेत.

## बदलते तंत्रज्ञान

### 'अशी' वीज वाचवून बिल होईल कमी!



आजकाल वीज बिले मोठ्या प्रमाणावर वाढली आहेत. ० ते १००नंतर थेट १०१ ते ३०० युनिटचाच स्लॅब आहे. यामुळे १०० युनिटचा आकडा मीटरने ओलांडला की दीड हजाराच्या आसपास बिल आलेच म्हणून समजा. वन बीएचके फ्लॅटधारकांचेही बिल आता १२०० ते १५०० रुपये येऊ लागले आहे. मीटर फास्ट पळतायत की अन्य काही हे समजायला मार्ग नाहीय. असे असताना तुम्हीच तुमच्या वापरावर नियंत्रण ठेवले, तर वीजही वाचवता येईल आणि पैसेही...

जेव्हा जेव्हा खोली सोडण्याची वेळ येते तेव्हा विद्युत उपकरणे बंद करण्यास विसरू नका. वापरात नसताना वाहनांची इंजिने आणि विद्युत उपकरणे बंद करा.

वीज वाचविण्याचे पहिले पाऊल म्हणजे योग्य उपकरणांची निवड करणे. इन्व्हर्टर टेक्नॉलॉजी असलेली उपकरणे हा सर्वोत्तम पर्याय असू शकतो. कारण ते ऊर्जे चा वापर कमी करतात आणि विजेचा अपव्यय टाळतात.


ज्याप्रमाणे इंजिनला वेळोवेळी मेंटेनन्सची आवश्यकता असते, त्याचप्रमाणे लाईट सेटअप देखील तपासावा लागतो. परंतू, बरीच वर्षे आपण ते तपासत नाही. मग कुठे वायर शॉर्ट असते, कुठे उपकरण जुने झाल्याने वीज खात असते. असे प्रकार हळू हळू मीटर पळवायला लागतात.

सौर पॅनेल वापरून घरे आणि कार्यालयांना वीज पुरवठा केला जाऊ शकतो. जर तुमच्याकडे गार्डन आहे. टेरेस आहे किंवा घराबाहेर रात्रीच्या वेळी लाईट लावायच्या असतील तेव्हा तुम्ही सौर उर्जेवरील लाईट वापरू शकता. यामुळे तुम्हाला वीज कमी लागेल.

वीज वाचविण्यासाठी उपकरणांची काळजी घेणे आवश्यक आहे. अनेक उपकरणांची ऑन–ऑफ सायकल असते. यामुळे ही उपकरणे वेळोवेळी तपासून घ्यावीत. एसी, फ्रिजचे कॉम्प्रेसर, गॅस आदी गोष्टी तपासाव्यात, जेणेकरून ते थंड करण्यासाठी जास्त वीज खर्च करणार नाहीत.

तुमच्या उर्जेच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपकरणे विनाकारण चालू ठेवणे, बंद करायचा कंटाळा करणे असे प्रकार करू नका. यामुळे मीटरमधील युनिट वाढतात आणि १०० चा आकडा गाठला की वेगळा दर आणि कर चालू होतो.

# शास्त्रज्ञ, राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम



## निमित्त

भारताचे महान शास्त्रज्ञ आणि राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा आज स्मृतिदिन. त्यांचे पूर्ण नाव अवुल पाकीर जैनुलब्दीन अब्दुल कलाम. भारताच्या क्षेपणास्त्र आणि अण्वस्त्र कार्यक्रमात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

डॉ. अब्दुल कलाम यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडूमधील रामेश्वरम येथील तमिळ मुस्लीम कुटुंबात झाला. त्याच्या वडिलांचे नाव जैनलाब्दीन होते व ते व्यवसायाने बोटी भाड्याने द्यायचे आणि विकायचे. कलामजींचे वडील निरक्षर होते, पण त्यांचे विचार सामान्य विचारांपेक्षा खूप वरचे होते. त्यांच्या आईचे नाव असिमा, जी एक गृहिणी होती.

अब्दुल कलाम यांना तीन मोठे भाऊ आणि एक मोठी बहीण अशी एकूण ही पाच भावंडे होती. अब्दुल कलाम यांचा जन्म झाला तेव्हा त्यांचे कुटुंब गरिबीशी झुंजत होते. कुटुंबाला मदत करण्यासाठी त्यांनी तरुण वयातच वर्तमानपत्र विकायला सुरुवात केली. शाळेच्या दिवसात ते नवीन गोष्टी शिकण्यासाठी नेहमी तयार असायचे आणि तासनतास अभ्यास करायचे.

डॉ. अब्दुल कलाम हे तामिळनाडूतील श्वार्ट्झ हायर सेकेंडरी स्कूलमधून मॅट्रिक झाले . प्रारंभिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी १९५४मध्ये सेंट जोसेफ कॉलेज, तिरुचिरापल्ली येथून भौतिकशास्त्रात बीएससी पदवी प्राप्त केली. त्यानंतर ते १९५५ मध्ये मद्रासला गेले. कलामजींना फायटर पायलट व्हायचे होते, ज्यासाठी त्यांनी एरोस्पेस इंजिनिअरिंगच्या इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये शिक्षण घेतले, पण त्यांना परीक्षेत नववे स्थान मिळाले, तर आयएएफने आठ निकाल जाहीर केले, ज्यामुळे ते यशस्वी होऊ शकले नाहीत.

पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी एका प्रकल्पावर काम करण्यास सुरुवात केली आणि प्रकल्प प्रभारींनी अवघ्या तीन दिवसांत रॉकेट मॉडेल पूर्ण करण्यासाठी वेळ दिला आणि हे देखील सांगितले की जर हे मॉडेल बनवता आले नाही, तर त्यांची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल. मग काय उरले होते? अब्दुल कलाम यांनी ना रात्र पाहिली, ना दिवस पाहिला, ना भूक पाहिली, ना तहान. अवघ्या २४ तासांत त्यांनी आपले लक्ष्य पूर्ण करीत रॉकेटचे मॉडेल तयार केले. हे मॉडेल इतक्या लवकर पूर्ण होईल यावर प्रकल्प प्रभारींना विश्वास बसत नव्हता. ते मॉडेल पाहून प्रकल्प प्रभारीही आश्चर्यचकित झाले.

१९५८मध्ये, कलाम जी डीटीडी आणि पी. टेक्निकल सेंटरमध्ये वरिष्ठ शास्त्रज्ञ म्हणून काम करू लागले. येथे राहताना त्यांनी प्रोटोटाइप हॉवर क्राफ्टसाठी तयार केलेल्या वैज्ञानिक टीमचे नेतृत्व केले. आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीला अब्दुल कलामजींनी भारतीय लष्करासाठी एक छोटे हेलिकॉप्टर डिझाइन केले होते. १९६२मध्ये अब्दुल कलामजींनी संरक्षण संशोधन सोडून भारताच्या अंतराळ संशोधनात काम करायला सुरुवात केली. त्यांना भरीव योगदानासाठी भारताचा सर्वांत मोठा सन्मान भारतरत्न प्रदान करण्यात आला. पुढे १८ जुलै २००२ रोजी त्यांनी राष्ट्रपतिपदाची शपथ घेतली. २७ जुलै २०१५ रोजी त्यांचे निधन झाले.

## क्लिक...क्लिक...!



(छाया : अमेय नाझरे)

**श्रीवर्धन : गेले दोन दिवस सलग रायगड जिल्ह्याला रेड अलर्ट दिला आहे. बोर्ली पंचतन परिसरात धुवांधार पाऊस पडत आहे.**

## आरोग्य प्रहर

### पावसाळ्यात थंड पदार्थ खाणे का टाळावे?



पावसाळ्याच्या दिवसांमध्ये आरोग्याला लाभदायक एक महत्त्वाची गोष्ट सर्वांनी पाळली पाहिजे, ती म्हणजे शीत म्हणजे थंड पदार्थ वर्ज्य करणे. पावसाळ्यामधील थंडगार वारे, गार पाण्याचा वर्षाव, निसर्गात सर्वत्र वाढलेला थंडावा आणि हवेत वाढलेली आर्द्रता या सर्वाचा विचार करून आयुर्वेदाने दिलेला शीत वर्ज्य करण्याचा हा सल्ला प्रत्यक्षातही आरोग्यास लाभदायक सिद्ध होतो.

वातावरणात वाढलेल्या शीत वातावरणाप्रमाणे शरीरामधील वातावरणही जर शीत झाले, तर ते अनेक रोगांना आमंत्रण देणारे होऊ शकते. विशेषतः शीत वातावरणामध्येच ज्यांचा प्रसार होतो अशा सर्दी, खोकला, थंडीताप, इन्फ्लूएंजा, स्वाईन–फ्लू वगैरे व्हायरल इन्फेक्शन्सना कारणीभूत होणाऱ्या विषाणूंची वाढ व प्रसार रोखण्यास हा 'शीत त्याग' निश्चित साहाय्यभूत होऊ शकतो.

शीत–त्याग म्हणताना इथे शीत आहार व विहाराचा त्याग अपेक्षित आहे, म्हणजे केवळ खानपानामध्ये नव्हे; तर दैनंदिन व्यवहारामध्येही 'शीत त्याग' करायला हवा. यामागील आयुर्वेद–शास्त्रोक्त कारणसुद्धा समजून घेऊ.

उन्हाळ्यामधील कोरडी हवा व थंड–कोरडा आहार यामुळे शरीरात जमलेला वात हा पावसाळ्यातील थंड वातावरणामुळे प्रकुपित होतो अर्थात उसळतो. पावसाळ्यात पोटफुगी, अंगदुखी, सांध्यांचे, स्नायूंचे, हाडांचे, नसांचे व कंडरांचे असे वेगवेगळे वातविकार सुरू होतात किंवा असल्यास बळावतात, हा पावसाळ्यातील वातप्रकोपाचाच प्रताप असतो. अशावेळी त्या वाताला नियंत्रणात ठेवेल असा आहार घ्यायला हवा, जो स्वाभाविकरित्या उष्ण गुणांचा असायला हवा; अन्यथा शीत आहार व शीत विहार हा वाताचा प्रकोप अधिकच वाढवून वाताचे विविध विकार बळावण्याचा धोका बळावतो.

प्रामुख्याने ज्यांना थंडी, पाऊस बाधतो अशा शीत (कफ–वात) प्रकृतीच्या माणसांनी, पावसाळ्यात कफविकारांनी आणि वातरोगांनी त्रस्त होणाऱ्यांनी विशेषकरून त्यापासून दूर राहावे. जेव्हा बाहेरचे वातावरण थंड, कुंद, ओलसर व पाण्याचा सतत वर्षाव करणारे असते आणि सभोवताली सर्वत्र पाणी साचलेले असते अशा परिस्थितीत सर्वांनीच शीत आहार टाळणे योग्य.

# माथेरानच्या डोंगररांगेत भूस्खलन

## गारबटवाडी गावात जमिनीला पडल्या भेगा

**नेरळ : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील इरशालवाडी गावावर दरड कोसळून घडलेली दुर्घटना ताजी असतानाच आता माथेरानच्या डोंगररांगेत वसलेल्या गारबटवाडी गावात भूस्खलन झाल्याची घटना घडली आहे आहे. तर जमिनीलादेखील मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या असल्याने येथील ग्रामस्थ सांगत आहेत. यामुळे येथील नागरिक भयभीत झाले झाले असून घटनास्थळी खालापूरचे तहसीलदार व आपत्ती व्यवस्थापन प्रशासन दाखल झाले आहेत.

ईशालवाडीची दुर्घटना ताजी असतानाच खालापूर तालुक्याच्या हद्दीत असलेले मात्र माथेरानच्या डोंगर कुशीत वसलेले गारबटवाडी गावात बुधवारी (दि. २६) पहाटेच्या सुमारास जमिनीला भेगा पडून काही ठिकाणी भूस्खलन झाले असल्याचे ग्रामस्थांच्या नजरेत आले. तीनशे





लोकांची वस्ती गारबटवाडी या गावाला आता भूस्खलनाचा धोका निर्माण झाला आहे.

या गावात जाण्यासाठी माथेरानच्या दस्तुरी या पॉइंट येथून जावे लागते. माथेरानच्या या सह्याद्रीच्या डोंगर कुशीत वसलेले हे गाव मुसळधार पावसामुळे पोखरू लागलं आहे. खालापूर

### स्थलांतर होण्यास नकार

***रायगड जिल्ह्याला अक्षरशः पावसाने झोडपून काढले आहे. सध्या हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केले असून जिल्ह्या प्रशासनाने सुरक्षितेच्या दृष्टीने काही गावांना स्थलांतर करण्यासाठी नोटीसा दिल्यात, परंतु काही गाव स्थलांतर होण्यास नकारदेखील देत असल्याचे समोर आले.***

तहसीलदार आयुब तांबोळी व आपत्ती व्यवस्थापन प्रशासन यांनी गावाला भेट देत, नागरिकांना स्थलांतर होण्यासाठी सूचना केल्यात. तर माथेरानच्या डोंगर कुशीतील दुसऱ्या टोकाला असणाऱ्या पनवेल तालुक्यातील धोदाणी गावात ही डोंगराचा भाग खचून गावाला धोका निर्माण झाला, येथे ग्रामस्थ रात्रभर जागून आहेत, प्रशासन रात्री घटनास्थळी दाखल झाली. काही तरुण मंडळी मदतीसाठी पोहचली, सतत धार पडणाऱ्या या मुसळधार पावसाने हाहाकार माजवला असल्याने डोंगर परिसरातील राहणाऱ्या आदिवासी भागातील नागरिकांचे जीवन मात्र धोक्यात आले आहे.

# अतिवृष्टीत शाळा बंदचे आदेश उशीरा

## विद्यार्थी, पालक, शिक्षक हवालदिल; सकाळच्या सत्राला सर्वाधिक त्रास

**पाली : प्रतिनिधी**

मागील आठवडाभरापासून जिल्ह्यात अतिवृष्टी सुरू आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी खबरदारी घेत शाळांना सुटी जाहीर केली आहे. त्यामुळे सलग पाच दिवस व बुधवारी (दि. २६) धरून एकूण सहा दिवस शाळांना सुटी मिळाली आहे, मात्र सुटीचे हे आदेश पालक व शिक्षकांपर्यंत उशिराने पोहचत आहेत. परिणामी शाळेला निघालेली व वाटेत असलेल्या विद्यार्थ्यांची गैरसोय होते. त्यांना तसेच मागे फिरावे लागते. शिवाय पालकांनादेखील हकनाक त्रास होत आहे. अभ्यासदेखील बुडतो.

रायगड जिल्ह्यातील बहुतांश खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांना मोठे गाव, किंवा शहरात शाळा व महाविद्यालयात शिकण्यासाठी जावे लागते. शिवाय इंग्रजी माध्यमातील काही विद्यार्थी स्कूल बसने शाळेला जातात. अशावेळी ज्या शाळा व महाविद्यालये सकाळ सत्राच्या असतात त्यांना पहाटे किंवा सकाळी समाज



माध्यम किंवा व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून आलेले सुटीचे पत्र किंवा मेसेज लगेच पाहता येत नाही. किंवा सर्वांना लगेच मिळत नाही. अशावेळी शाळा महाविद्यालयात निघेलेल्या विद्यार्थ्यांना अर्ध्यावाटेतून परतावे लागते. यामुळे त्यांचा वेळ व श्रम वाया जातो.

सलग पाच दिवस व लगेच एक दिवस आड अशा सहा दिवस सुट्ट्या मिळाल्याने या सुट्ट्या रविवार किंवा इतर सुटीच्या वारी भरून काढल्या जातील का अशी शंका अनेकांना आहे. तसेच गणपती दिवाळीच्या सुट्या कमी केल्यास काय करावे असादेखील प्रश्न अनेकांना पडला आहे.

**शाळा जर सकाळी लवकर असेल तर पालक तयारीत असतात आणि शाळा बंद आदेश उशिरा येतात. महीला वर्ग सकाळी लवकरच उठून तयारी करतात आणि सगळे पाण्यात जाते. मुले अतिवृष्टीमध्ये अडकू नयेत हा उद्देश असतोच पण हे उशीरा सुचलेले शहाणपण असे होते. मुलाला अर्ध्यावाटेतून स्कुलबस घरी घेऊन आली.**

**–मेघना निंबाळकर, गृहिणी, पाली**

# उद्धव ठाकरे गटातून भरत भगत राष्ट्रवादीमध्ये

**नेरळ : प्रतिनिधी**

बाळासाहेबांचा कट्टर शिवसैनिक अशी ओळख सांगणारे शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे भरत भगत यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्ष कार्यालयात हा पक्ष प्रवेश सोहळा झाला.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत भरत भगत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. भरत भगत यांच्या राष्ट्रवादी प्रवेशामुळे कर्जत तालुक्यातील अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीला एक बुलंद आवाजाचा नेता मिळाला आहे.



कर्जत खालापूर विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करू पाहणारे राष्ट्रवादीचे नेते सुधाकर घारे यांच्या नेतृत्वाखाली भरत भगत यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. स्वतःला बाळासाहेबांचा कट्टर शिवसैनिक अशी ओळख भरत भगत हे करून देतात, मात्र या बाळासाहेबांचा शिवसैनिकाने आता शिवबंधन काढून आपल्या हातात राष्ट्रवादीचे घड्याळ बांधले आहे.

त्यांच्या या राष्ट्रवादी पक्षाप्रवेशामुळे सुधाकर घारे गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला किती फायदा होते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# रायगडातील सहा हजार जणांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सुरू असलेला मुसळधार पाऊस या पार्श्वभुमीवर जिल्ह्यातील १७७६ कुटूंबातील सहा हजार १५९ जणांना सुरक्षितस्थळी स्थलांतरीत करण्यात आले आहे. अतिवृष्टीमुळे इरशाळवाडी येथील दरड दुर्घटनेत २७ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ५७ जण बेपत्ता आहेत. या सर्व घटनांच्या पार्श्वभुमीवर प्रशासनाने दरडींचा आणि पूराचा धोका असलेल्या गावांमधील नागरिकांचे स्थलांतरण सुरू केले आहे.

अलिबाग तालुक्यातील १२८, पेण २५६, मुरूड ४०, कर्जत ३९२, खालापूर ४२१, रोहा १३५१, तळा १५०, माणगाव १६३, महाड २२०८, पोलादपूर ४७९ आणि श्रीवर्धन ४२ जणांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आलेय. ४६ ठिकाणी या लोकांची व्यवस्था करण्यात आली आहे.

# रायगडात १०४.२ मि.मी. पावसाची नोंद

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागात बुधवारी (दि. २६) सरासरी ८८.७ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद रत्नागिरी जिल्ह्यात १०४.५ मि.मी. झाली आहे. ठाणे ६६.८ मि.मी., पालघर ७९.३मि.मी, रायगड १०४.२मि.मी., रत्नागिरी १०४.५ मि.मी., सिंधुदुर्ग ६५.४ मि.मी. अशी जिल्हा निहाय पावसाची आकडेवारी आहे.



**माणगाव : येथे आढळलेल्या हरीणीला पकडून वनविभागाच्या पथकाने सुरक्षित ठिकाणी सोडले.** (छाया : सलीम शेख)


## नमुना एन. डी.

**(नियम ९२ (३) पहा)**

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. - मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH 01BK 2271 (फोरव्हिलर मारूती सुझुकी स्विफ्ट) चे मालक विजय मालवणकर यांचे दि. ५/०७/२०२३ रोजी निधन झालेले आहे.

मी, रसिका मालवणकर– पत्ता : – ३ क/१७०२, इंडिया बुल्स ग्रीन लव्हेंडर को.ऑप,हौ,सोसायटी, कोन रसायनी, ता. पनवेल, जि. रायगड,४१०२२१ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे / प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे / प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल / प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेल महानगरच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव :** रसिका मालवणकर
पत्ता : ३ क/१७०२, इंडिया बुल्स ग्रीन लव्हेंडर को. ऑप,हौ, सोसायटी , कोन रसायनी, ता. पनवेल जि. रायगड, ४१०२२१


# मुंबई सेझला विकलेल्या जमिनी परत मिळण्याकरीता बैठक

## आमदार रविशेठ पाटील यांचा पाठपुरावा



**पेण : प्रतिनिधी**

विधानभवनात मुंबई सेझला विकलेल्या जमिनी परत मिळण्याकरीता महसुलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शासकीय बैठक आमदार रविशेठ पाटील यांच्या पाठपूराव्याने आयोजित करण्यात आली.

या बैठकीमध्ये शेतकरी प्रतिनिधी नंदू म्हात्रे, ज्येष्ठ नेते दिलीप पाटील, काशिनाथ पाटील, गंगाधर ठाकूर, नारायण म्हात्रे, देविदास वर्तक, प्रवीण पाटील, संदेश पाटील आदी मान्यवर शासकीय प्रतिनिधी म्हणून सचिव आयुक्त कोकण आयुक्त पुनर्वसन सचिव अन्य शासकीय अधिकारी यांनी सविस्तर चर्चा केली.

महसुल मंत्री महोदयांनी शेतजमिनी मूळ शेतकऱ्यांना परत देण्याबाबत सुचना केल्या व मुंबई येझ या कंपनीचे नाव कमी करून जमिनी शासनाकडे वर्ग करण्याचा व शासनामार्फत शेतकऱ्यांना परत देण्याचा निर्णय घेणेबाबत शेतकऱ्यांकडून संमतीचा प्रस्ताव देण्याबाबत सुचवले. त्यामुळे सेज जाऊन शेतकऱ्यांच्या सेझला गेलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत मिळण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत यामुळे शेतकर्यांमधे आनंदी वातावरण निर्माण झाले असुन शेतकरी वर्गाकडून मंत्री महोदय व आमदार रविशेठ पाटील यांचे मन पुर्वक धन्यवाद मानत आहेत.

यापुढे २४ गाव (सेझ) विरोधी शेतकरी संयुक्त कृती समिती शेतकऱ्यांसोबत चर्चाकरून शेतकऱ्याचा निर्णय शासनास सादर करणार आहेत. लवकरच आगरी विकास मंच पेण येथे सभेचे आयोजन करण्यात येणार आहे.


## जाहीर प्रसिध्दीकरण

इंडियाबुल्स ग्रीन्स मॅरिगोल्ड सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., कोन ता. पनवेल जि. रायगड या संस्थेच्या सन २०२३ ते २०२८ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी सुधारीत निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. सदर कार्यक्रमानुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादीचे प्रकाशन दि. २८/०७/२०२३ रोजी व मतदान दिनांक ०६/०८/२०२३ रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयांत व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, पनवेल, पहिला मजला, कृषि उत्पन्न बाजार समिती, सहकार नगर, रायगड बाजारच्या बाजूला पनवेल जि. रायगड ४१०२०६ यांचे कार्यालयांत पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**(निता पुगांवकर)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**


# पावसांची तमा न बाळगता भात लागवड

**खोपोली, मोहोपाडा : प्रतिनिधी**

जुन महिन्यातील मृग नक्षत्र कोरडे पडले, मात्र काही दिवसांत पावसांचे आगमन झाले. गेले अनेक दिवस पावसाच्या दमदार आगमन होत असल्यामुळे, बळीराजाला चांगलाच दिलासा मिळाला आहे. भात लागवड करण्यासाठी राब चांगले तयार झाले असून मजुरअभावी भात लागवड कामे खोळंबळी आहे. यामुळे जिद्दीने आणि जोमाने बळीराजा शेतीच्या कामात व्यस्त झाले आहे.

बळीराजा भात लागवड करण्यासाठी सज्य झाल्याचे चित्र अनेक ठिकाणी पहावयास मिळत आहे. एक आठवड्यात भात लागवडीची कामे पुर्ण होतील असा प्राथमिक अंदाज शेतकऱ्यांनी व्यक्त केला. दिवसभरामध्ये पावसाच्या सरी येत असून जिकडे तिकडे भात लागवड सुरु असून या कामासाठी मजूरांची मनधरणी सुरू आहे.ज्यांची कमी भात शेती आहे. त्यांची भात लागवड पुर्ण झाली आहे.तर काहीच्या शेतमजूर अभावी शेतीची कामे खोळंबळी आहे. मिळेल त्या मजुरांना घेवून भात लागवड गेल्या आठवड्यापासून सुरू झाली आहे. गेले अनेक दिवस शेतामध्ये पाणी नव्हते यामुळे राबांची वाढ ही होत नव्हती. अखेर आद्र नक्षत्राचा पावसाचे आगमन दमदार झाल्याने शेतकरी सुखावला. तालुक्यातील ग्रामीण भागात भात लागवड करण्यासाठी वेग घेतलेला चित्र सध्या पहावयास मिळत आहे.

पावसाच्या अगमनाने अनेक ठिकाणी पावसाचे पाणी तुंबले असून ग्रामीण भागात नालेही दुथडी भरून वाहू; लागले आहे. शिवाय शेतामध्ये मुबलक पाणी जमा झाल्यामुळे भात शेती लागवडीस जोर धरला आहे. यामुळे एक आठवड्याच्या आत भात लागवड पुर्ण होईल असा प्राथमिक अंदाज शेतकरी वर्ग व्यक्त करीत आहे.



# माजी मंत्री भाई मोहन पाटील यांचा स्मृतीदिन



**पेण :** महाराष्ट्र राज्याचे मा. राज्यमंत्री स्व. भाई मोहन पाटील यांचा ९ वा स्मृतीदिन पेण मधील वाक्रुळ येथील स्नेह सागर या बंगल्यावर झाला. यावेळी ह.भ.प. योगीराज महाराज गोसावी (शांती ब्रम्ह एकनाथ महाराजांचे १४ वे वंशज, श्री क्षेत्र पैठण) यांचा श्री. सुश्राव्य हरी किर्तनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या किर्तनाचा लाभ शेकडो श्रोतेगणांनी घेतला. या वेळी हितचिंतक ह भ प. किर्तनकार महाराज, सांप्रदाय मंडळी व राजकीय व सामाजिक, शैक्षणिक, क्रिडा क्षेत्रातील क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते व उपस्थीत होते त्यांनी आपली उपस्थिती दर्शवून मोहन भाई पाटील यांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले.

ह.भ.प. योगीराज महाराज गोसावी याचे प्रवचन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी त्यांचे स्वागत केले.


महाराष्ट्रü औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. २७/२०२३-२०२४ (मुंबई) करीता**

दिनांक ०७/०६/२०२३ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक जागरुक टाईम्स, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | शहापूर धेरंड औद्योगिक क्षेत्र ... शहापूर धेरंड औद्योगिक क्षेत्रासाठी चौपदरी सिमेंट कॉक्रीट पोहोच रस्ता बांधणे, औद्योगिक क्षेत्राअंतर्गत दुपदरी सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे, आरसीसी बांधीव गटर, पूल, बॉक्स कल्व्हर्ट इत्यादीचे बांधकाम करणे व पथदिवे उभारणे तसेच संलग्न कामे करणे. |

आता उपरोक्त कामांकरीता ई निविदा प्रपत्र दिनांक ३१/०७/२०२३ पर्यंत महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असेल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतक कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# नवी मुंबईत डासविरोधी धुरीकरण

## गृहनिर्माण संस्थांच्या परिसरात फवारणीला सुरुवात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने गृहनिर्माण संस्थांच्या परिसरात डासविरोधी धुरीकरण फवारणीला सुरुवात करण्यात आली आहे. माजी परिवहन समिती सदस्य विसाजी लोके यांनी केलेल्या मागणीची दखल घेत तसेच नागरिकांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी पालिकेच्या माध्यमातून डासविरोधी फवारणी करण्यात येत आहे.





पावसाळा सुरू झाला की अनेक ठिकाणी पाणी साचते आणि मग त्यातून मच्छरांना आमंत्रण दिले जाते. अनेक ठिकाणी सोसायटीच्या आवारात बिल्डिंगमध्ये, उद्यानांमध्ये आजूबाजूला असलेल्या दुकानांमध्ये किंवा इतरत्र मच्छरांची भुणभुण कानाजवळ आवाज करत असते त्यामुळे अनेकांना ह्या मच्छरांचा नाहक त्रास सहन करावा लागतो, तर अनेकांना वेगवेगळ्या आजाराला बळी पडावे लागते त्यामुळे पावसाळ्यामध्ये मच्छरांना आणि आजारांना आयते आमंत्रण दिले जाते असच म्हणावे लागेल.

त्यामुळे अशा वेळी धूर फवारणीची आवश्यकता असते, मात्र पालिकेच्या वतीने वरवर धूर फवारणी केली जाते अनेक अडगळीच्या जागी धूर फवारणी पोहचलीच जात नाही त्यामुळे अनेक रहिवासी नाराजगी व्यक्त करत आहेत. सानपाडा विभागातील गृहनिर्माण सोसायटीच्या अडगळीची जागा जिन्याखालील जागा मागील परिसर अथवा पाणी साचणारी जागा अशा ठिकाणी फवारणी केली जात नसल्याचे अनेक वेळा स्थानिक नेत्याच्याही निदर्शनास आले आहे सानपाडा परिसरात काही महिन्यांपासून प्रशासनाद्वारे डास विरोधी धुरीकरण मोहीम राबवली जाते, परंतु ती फक्त बंद गटांरामध्येच केली जाते.

गृहनिर्माण सोसायटीच्या अडगळीची जागा जिन्याखालील जागा मागील परिसर अथवा पाणी साचणारी जागा अशा ठिकाणी फवारणी केली जात नसल्यामुळे अनेक रहिवासी हे नाराजगी व्यक्त करत आहेत. त्यामुळे या ठिकणीदेखील धूर फवारणी करणे आवश्यक आहे, जेणेकरून डास तसेच मच्छरांचा प्रादुर्भाव वाढणार नाही.

सानपाडा सेक्टर ७, ८,व सेक्टर १० या परिसरातील सोसायटीच्या अडगळीच्या जागा जिन्याखालील जागा ठिकाणी धुरीकरण फवारणी सुरू करण्याची मागणी माजी परिवहन समिती सदस्य विसाजी लोके यांनी मनपा आयुक्तांकडे मागणी केली होती. त्यांच्या ह्या मागणीला यश आले असून सानपाडा परिसरातील अडगळीच्या ठिकाणी धूर फवारणीचे काम सुरु झाले असून रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

## पेन्शनधारकांसाठी आज निधी आपके निकट कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना, प्रादेशिक कार्यालय, वाशी यांनी या वेळी पीएफ खातेदार, नव्याने जागृत झालेल्या संस्था आणि पेन्शनधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांच्या अखत्यारीतील एका ठिकाणी रिलायन्स कंपनी घणसोली येथे निधी आपके निकट कार्यक्रमाचे आयोजन करणार आहे.

खातेदारांना त्यांच्या कामासाठी क्षेत्रीय कार्यालय, वाशी येथे येण्याची गरज पडू नये यासाठी गुरुवारी (दि. २७) 'निधी आपके निकट २.०' या कार्यक्रमात पीएफ, नवीन कव्हर केलेल्या संस्था आणि पेन्शनशी संबंधित तक्रारी ऐकल्या जातील. यासोबतच नव्याने समाविष्ट आस्थापनांच्या नियोक्त्यांना पीएफ संबंधित मार्गदर्शनही उपलब्ध करून दिले जाईल. यासाठी प्रादेशिक कार्यालय वाशीतर्फे जे.पी. चौहान, प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त म्हणाले की, सध्या निधी तुमच्या निकतची व्याप्ती वाढवण्याच्या प्रक्रियेत 'निधी आपके निकत २.०' आणण्यात आले आहे.

या कार्यक्रमात डी. रेमी, अतिरिक्त केंद्रीय भविष्य निर्वाह निधी आयुक्त आणि जेपी चौहान, प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त आणि नोडल अधिकारी समस्या ऐकून त्याचे निराकरण करतील. ईपीएफओचे नियोक्ते, सदस्य जास्तीत जास्त संख्येने सहभागी होऊन त्यांच्या समस्या जागेवरच सोडवू शकतात. इ पीएफओ खाजगी, संघटित आणि सार्वजनिक क्षेत्रातील युनिट्समध्ये कार्यरत कामगार आणि कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करते.

## निवडक

### इन ॲण्ड आउट स्टोअरचे उद्घाटन



**पनवेल :** भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने ग्राहकांच्या किरकोळ विक्रीवर लक्ष केंद्रित करण्याच्या उपक्रमांचा एक भाग म्हणून बीपीसीएलच्या रिटेल आउटलेट मे. अमोल ऑटो येथे इन अँड आउट स्टोअरचे पनवेल तालुक्यातील शेडूंग येथे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये लोकांना आणि ग्रामीण भागातील लोकांना परवडणाऱ्या दरात दर्जेदार ब्रँडेड घरगुती वस्तू उपलब्ध करून देणे या हेतूने भारत पेट्रोलियमने ग्रामीण भागात तालुका स्तरावर अमोल ऑटो शेडूंग येथे रिटेल आउटलेट दुकाने उघडले आहे. ज्यामध्ये उर्जा देवी यांचीही गावपातळीवर नियुक्ती करण्यात आल्या आहे. या उद्घाटनावेळी भारत पेट्रोलियमचे पी. एस. रवी (ईडी, कॉर्पोरेट संस्था), अनिल कुमार पी ईडी (जीएएस), शुभंकर सेन (हेड, रिटेल वेस्ट), बिजू गोपीनाथ (नवीन व्यवसाय प्रमुख), राकेश के. सिन्हा (राज्य प्रमुख रिटेल महाराष्ट्र आणि गोवा), उमेश कुलकर्णी (टेरिटरी मॅनेजर रिटेल मुंबई) हजर होते तसेच भारत पेट्रोलियमचे कर्मचारी व पनवेल परिसरातील मान्यवर उपस्थित होते.

### राजेश पाण्डेय यांचे अभीष्टचिंतन

**पनवेल :** पनवेल, कळंबोली व खारघर विभागातील उत्तर भारतीय बांधवांच्या अनेक समस्यांना मदतीला धावून



जाणारे तसेच कळंबोली परिसरात राहणारे सामाजिक कार्यकर्ते व उद्योजक राजेश पाण्डेय यांचा वाढदिवस समाजबांधवांसह, विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांनी शुभेच्छा देऊन साजरा केला. राजेश पाण्डेय यांना वाढदिवसानिमित्त केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, राज्यमंत्री सुरेश खाडे, खासदार राहुल शेवाळे, खासदार गजानन कीर्तिकर यांनी शुभेच्छा पत्र पाठवून त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. दरम्यान, राजेश पाण्डेय यांच्या वाढदिवसानिमित्त अन्नदान, वृक्षारोपण, शैक्षणिक साहित्याचे वाटप असे विविध सामाजिक कार्यक्रमाचे उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांना राजेश पाण्डेय यांनी भेट देऊन गरीब व गरजूंना साहित्याचे वाटप केले.

## अक्कादेवी अंगणवाडीवर पडलेले झाड हटविले

**उरण : वार्ताहर**

चिरनेर येथील अक्कादेवी आदिवासी अंगणवाडीवर, १९ जुलै रोजी झालेल्या पावसात कोसळून पडलेले झाड बाजूला हटवून अंगणवाडीच्या विद्यार्थ्यांचा शाळेत जाण्याचा मार्ग खुला केला आहे.

अंगणवाडीवर झाड कोसळून पडल्यामुळे, विद्यार्थ्यांच्या शाळेत जाण्याच्या मार्गात अडथळा निर्माण झाला होता. अंगणवाडी सेविका दमयंती ठाकूर यांनी अंगणवाडीवर कोसळून पडलेल्या या झाडाची माहिती दिली. मंगळवारी १९ जुलै रोजी चिरनेर गावाला पावसाचा मोठा तडाखा बसला. यात अनेकांच्या घरात पाणी शिरून मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. येथील काही घरांच्या भिंतींची पडझड आणि झाडे कोसळून पडली आहेत. तसेच गावातील काही अंतर्गत रस्ते उखडले आहेत. सध्या नुकसानीच्या पंचनामांचे काम सुरू आहे.



## कारगिर विजय दिनानिमित्त माजी सैनिकांचा सत्कार

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कारगिल विजय दिवसाच्या निमित्ताने नेरूळमधील आर्मी कॉलनीमध्ये भाजप नवी मुंबईच्या वतीने माजी नगरसेवक तथा सभागृह नेते रवींद्र इथापे यांच्या माध्यमातून माजी जवान, कारगिल युद्धात सहभागी झालेले माजी वीर जवान, माजी ब्रिगेडियर, कर्नल, मेजर, कमांडर, स्वातंत्र्यसैनिक यांचा सत्कार माजी खासदार संजीव नाईक यांच्या हस्ते करण्यात आला.



या वेळी माजी खासदार संजीव नाईक यांनी देशासाठी अविरतपणे सेवा बजावणारा शूरवीर जवानांची आम्हास अभिमान असल्याचे सांगितले. ब्रिगेडियर धरमप्रकाश, ब्रिगेडियर माथुर, कमांडर देव वर्मा, कमांडर जे. एल. मन, कर्नल यशपाल कलजा, कॅप्टन रवि अय्यर, कॅप्टन सेक्युरिया, माजी नगरसेवक सुरेश शेट्टी, सुनील पाटील, आर्मी सोसायटीचे चेअरमन व्ही. एल. शंकर, द्वारकानाथ, आशिष अगरवाल, नितीन नाईक, रवींद्र सिंग, मिसेस शामला एस, हिना कासम, विजय साधवाणी, अतुल पांडे व इतर मान्यवर उपस्थित होते.

## रसायनीत विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

बिंग गुड फाऊंडेशन या सेवाभावी संस्थकडून दरवर्षी जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात येते. यावर्षी या फाउंडेशनच्या अध्यक्षा वैजयंती तुषार ठाकूर यांच्यावतीने रसायनीतील तुराडे जिल्हा परिषद शाळेतील ७१ विद्यार्थी, चांभार्ली जिल्हा परिषद शाळेतील ४२ विद्यार्थी व माजगाव –आंबिवली



जिल्हा परिषद शाळेतील ४० विद्यार्थ्यांना दोनशे पाणी वह्याचे वाटप करण्यात आले.

या वेळी बिंग गुड फाऊंडेशनचे संदिप पाटील, महेद्र ठाकूर तसेच परिसरातील माजी उपसरपंच दत्तात्रेय जांभळे यांच्यासह इतर मान्यवर व शालेय मुख्याध्यापक,शिक्षक उपस्थित होते.रसायनी परिसरातील इतर जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांनाही वह्याचे वाटप करण्यात येणार असल्याचे बिंग गुड फाऊंडेशनचा अध्यक्षा वैजयंती तुषार ठाकूर यांनी सांगितले.

दरम्यान, वह्या मिळाल्याने विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.

## स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनावणे यांचा गौरव

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेचे मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनावणे यांची झोकून देऊन काम करण्याची वृत्ती आणि सर्वांना सोबत घेऊन चालण्याचा संघटनशील स्वभाव यांचा नवी मुंबईच्या गौरवात महत्वाचा वाटा असल्याचे अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनी सांगितले.



माहे जुलै महिन्याच्या अखेरीस राजेंद्र सोनावणे विहित वयोमानानुसार नवी मुंबई महानगरपालिका सेवेतून सेवानिवृत्त होत असून त्या निमित्त घनकचरा व्यवस्थापन विभाग व स्वच्छ महाराष्ट्र अभियान कक्ष यांच्या वतीने वारकरी भवन, सीबीडी बेलापूर येथे सेवानिवृत्त शुभेच्छा समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या वेळी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, उप मुख्य स्वच्छता अधिकारी विनायक जुईकर, स्वच्छता अधिकारी सर्वश्री सूर्यकांत म्हात्रे, राजेंद्र इंगळे, सुधीर पोटफोडे, विजय पडघन, सुभाष म्हसे, सतिश सनदी आणि इतर अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे हा कार्यक्रम 'शून्य कचरा उपक्रम (झिरो वेस्ट इवेन्ट)' या संकल्पनेनुसार साजरा करण्यात आला.

उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांनी राजेंद्र सोनावणे यांची कामाप्रती असलेली निष्ठा आणि अथक मेहनत घेण्याची तयारी यावर अनेक प्रसंगांची उदाहरणे देत भाष्य केले. या वेळी विभागातील अनेक अधिकारी, कर्मचारी यांनी सोनावणे यांच्यासोबत काम करतानाच्या अनेक आठवणी व प्रसंग सांगितले. त्यांच्या पत्नी ललिता सोनावणे, मुलगा उमेश सोनावणे व कामगार नेते रवींद्र सावंत यांनीही मनोगत व्यक्त केले.

## उरण ते कार्ला बाईक रॅलीतून पर्यावरणाचा संरक्षणाचा संदेश

**उरण : बातमीदार**

सामाजिक कार्यकर्ते देविचंद अनंत म्हात्रे यांच्या संकल्पनेतुन एकविरा प्रेमी ग्रुप कोप्रोली उरण तर्फे दरवर्षी उरण ते कार्ला (एकविरा देवी मंदिर) असे बाईक रॅली काढली जाते व पर्यावरणाचा संरक्षणाचा संदेश देत दरवर्षी श्री एकविरा आई मंदिर कार्ला येथे डोंगर परिसरात वृक्षारोपण केले जाते.

उरण तालुक्यातील श्री एकविरा प्रेमी ग्रुप कोप्रोली उरण तर्फे यंदाही उरण ते श्री एकविरा मंदिर (कार्ला) अशी युवकांनी बाईक रॅली काढली. कार्लाल्या पोहोचल्यावर एकविरा आईचे दर्शन घेतले. त्यानंतर सर्वांनी एकत्र येत एकविरा देवी मंदिर परीसरात वृक्षारोपण केले. दरवर्षी अशा उपक्रमातून झाडे लावा झाडे जगवा असा संदेश या उपक्रमाक्रतून देण्यात येतो. या वेळी मी एकविरा प्रेमी ग्रुप कोप्रोली उरणचे एकूण २३५ पदाधिकारी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सायन-पनवेल महामार्गावरील खड्डे सात दिवसांत बुजवू

### सार्वजनिक बांधकाम विभागाचे लेखी आश्वासन

नवी मुंबई : बातमीदार

रस्त्यावरील खड्ड्यांमुळे सायन-पनवेल महामार्ग मृत्यूचा सापळा बनला असून वाहतूक कोंडीमुळे प्रवाशी हैराण झाले आहेत. यामुळेच येत्या सात दिवसांत सायन पनवेल महामार्गावरील सर्व खड्डे दुरुस्त करण्याचे लेखी आश्वासन सार्वजनिक बांधकाम विभागाने दिल्याचे मनसेने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.



१२५० कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या सायन-पनवेल महामार्गाची सालाबादप्रमाणे याही वर्षीच्या पावसाळयात दुरावस्था झालेली पहावयास मिळत आहे. रस्त्यांवरच्या या मोठ्या खड्ड्यांमुळे कित्येक दुचाकीस्वारांनी आपला जीव गमावला आहे. वाहनचालकांना आपला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अनेक वाहनांचे अपघात या दिवसांत झालेले आहेत. सदरचा महामार्ग हा मुंबई एन्ट्री पॉइंट आणि एक्झिट पॉइंट असल्यामुळे या महामार्गावर सततची वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते.

उपविभागीय अभियंता यांनी महामार्गावरील खड्डे पूर्णतः भरून सेवा सुस्थितीत करण्यासाठी नवीन कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आल्याचे स्पष्टीकरण दिल्याचे प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितले आहे.तरी अद्ययावत तंत्रज्ञान वापरून या खड्ड्यांची दुरुस्ती तात्काळ करण्यात यावी व रस्त्यांची डागडुजी अशा प्रकारे करावी जेणेकरून किमान ते दीर्घकाळ टिकतील. येत्या सात दिवसांत सायन पनवेल महामार्गावरील सर्व खड्डे बुजवून रस्ता दुरुस्त होईल, असे आश्वासन सार्वजनिक बांधकाम विभागाने दिले आहे.

दरम्यान, सायन-पनवेल महामार्गावरील नेरूळ येथे उरण फाटा उड्डाणपुलावर पडलेल्या खड्डयांमुळे वाहनचालकांचे कंबरडे मोडत आहे. उड्डाणपुलावर दरवर्षी पावसाळ्यात आणि बऱ्याचदा पावसाळा नसतानाही या पुलावर खड्डे पडतात. या खड्ड्यांमुळे मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्यामुळे वाहतूक मंदावली आहे.

## नवीन पनवेलमधून महिला मुलासह बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेलमधून एक महिला आपल्या एक वर्षाच्या मुलाला घेऊन कोणास काही एक न सांगता घरातून निघून गेली आहे. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. फिरोजा बेगम राजु दास (वय २५) ही मोंटु (वय १) याला घेऊन नवीन पनवेल सेक्टर सहा येथील राहत्या घरातून पतीने मारल्याचा राग मनात धरून काही एक न सांगता कोठेतरी गेली आहे. याबाबत महिलेचा पती राजु बाबु दास (वय ४२) याने खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. बेपत्ता महिलेचा रंग सावळा, उंची पाच फुट, बांधा सडपातळ, नाक सरळ फुगीर, केस काळे व लांब, अंगात आकाशी कुर्ता व काळी लेगीज, पायात लाल



चप्पल, तसेच तिच्या सोबत असलेला लहान मुलगा मोंटुचा रंग सावळा, अंगाने सडपातळ, अंगात आकाशी टी शर्ट व हाफ पॅन्ट घातला आहे.

या दोघांबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार नवनाथ नरळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शेतात पाणी तुंबल्याने लावणीत अडथळा

## तरवे कुजत असल्याने शेती नुकसानीत

**माणगाव : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून संततधार पडणाऱ्या पावसाने भातशेती संकटात सापडली असून तरवे व लावलेल्या रोपांचे नुकसान झाले आहे.

भातशेती लावणीला सुरुवात झाली आहे, मात्र शेतकऱ्यांना संततधार पावसाचाही फटका बसला आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात तालुक्यातील भातशेती लावणीस सुरुवात झाली आहे. पावसाने झोडपलेल्या शेतातून पाणी तुंबल्याने लावणीच्या कामात शेतकऱ्यांना अडचणी येत आहेत. तरवे पाण्यात राहिल्याने रोप कुजण्याचा धोका आहे. यामुळे दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांपुढे उभे ठाकले आहे.

पाऊस सुरूच असल्याने लावणीची कामे करणे अवघड होत आहे, तसेच तरवे कुजून गेल्याने लावणीसाठी रोपे कमी पडत आहेत. आहे त्या रोपांमध्ये लावणी करण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. लावणीसाठी मजूर मिळत नसल्याने व मजुरी परवडत नसल्याने शेतकरी कुटुंबातील सदस्यांसह थोडी थोडी लावणी करीत आहेत. तालुक्यात साधारणतः ११ हजार हेक्टर क्षेत्रावर या वर्षी भातशेती लागवड होत आहे.



**भातशेती लावणीस तयार होत आहे. संततधार पावसाने शेतीचे नुकसान होत आहे. त्यामुळे लावणी करताना अनंत अडचणी येत आहेत. गेले काही दिवस पावसाने उसंत घेतली नसल्याने आवन रोपे कुजत आहेत.**
**–बाळाराम भोनकर, शेतकरी, माणगाव**

# माथेरानसाठी लवकरच मिळणार नवीन मिनीबस

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरान ते कर्जत या दरम्यान सुरू असलेल्या मिनीबसेस वारंवार बंद पडत असल्याने माथेरानमधील नागरिकांना व विद्यार्थ्यांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळेच कर्जत-खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे यांनी यामध्ये लक्ष घातले असून माथेरानकरीता लवकरच नवीन बसेस येणार असल्याचे त्यांनी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.

नेरळ-माथेरानदरम्यान मिनीबस सुरू करावी याकरीता माथेरानमधील नागरिकांनी मोठा संघर्ष केला होता अनेक वर्षे पाठपुरावा केल्यानंतर ही सेवा सुरू झाली होती, परंतु घाटमार्ग असल्याने यावर चालणाऱ्या बसेस लवकरच नादुरुस्त होत असल्याने विशिष्ट कंपनीच्या बसेस असाव्यात असा निष्कर्ष समोर आला होता. दोन बसेस उपलब्ध असतानादेखील कर्जत आगाराने दोन्ही बसेस कर्जत ते माथेरान मार्गावर चालू न करता एकच बस चालू ठेवली होती. दुसरी बस कर्जत-पनवेल या मार्गावर धावत होती. माथेरानकरीता सुरू असलेली बस आता डबघाईला आली असून वारंवार रस्त्यात बंद पडत असल्याने येथे प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. त्याचप्रमाणे दैनंदिन प्रवास करणाऱ्या नागरिकांनाही त्याचा फटका पडत आहे. त्यामुळेच माथेरानच्या स्थानिकांनी यासाठी सातत्याने या बससाठी पाठपुरावा केला होता.



### आमदार महेंद्र थोरवे यांचे आश्वासन

मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांनीही माथेरानकरीता नवीन बस मिळावी याकरिता पत्रव्यवहार केला होता. आता आमदार महेंद्र थोरवे यांनी थेट मुख्यमंत्र्यांनाच लेखी निवेदन देऊन माथेरानकरिता नवीन बसेस उपलब्ध व्हाव्यात, अशी मागणी केली असून लवकरच माथेरानला नवीन बस येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. त्यामुळेच नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# डोंगरमाथ्यावर फेसाळणारा तळाघरचा धबधबा



**रोहे : प्रतिनिधी**

चोहोबाजूंनी हिरवेगार व्यापलेला निसर्ग जणू काय आपल्याला खुणावत आहे. या हिरव्यागार डोंगरमाथ्यावरून फेसाळत येणारा तळाघरचा धबधबा पर्यटकांसाठी एक पर्वणीच ठरत आहे.

रोहा शहरापासून तीन किमी अंतरावर तळाघर हे गाव आहे. धबधब्यापर्यंत गाड्या जात नसल्याने तळाघर येथे आल्यानंतर गावातच पर्यटकांच्या गाड्या उभ्या केल्या जातात. या गावातून २० मिनिटांच्या अंतरावर तळाघरचा धबधबा आहे. तळघर येथे आल्यानंतर येथून निसर्गाच्या सान्निध्यातून चालत धबधब्यापर्यंत जाताना पर्यटन एक आनंद येत असतो. रविवारी तर पर्यटकांनी हे ठिकाण गजबजलेले असते.

पूर्णपणे कातळावरून धबधबा खाली येत असतो. या धबधब्याचा आनंद घेण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने गर्दी करीत असतात. डोंगर माथ्यावरून फेसाळत खाली येणारा धबधब्याचा मनसोक्त आनंद पर्यटन घेत असतात. ही आठवण या आपल्याकडे रहावी यासाठी मोबाईलवरून फोटो काढण्याचा मोह पर्यटकांना आवरता येत नाही. याच ठिकाणी आजूबाजूला बसण्यासाठी हिरवेगार सपाट भाग असल्याने पर्यटक वनभोजनाचा आनंदही घेत असतात.

नेहमीच पर्यटकांची या धबधब्यावर गर्दी असते. हिरवेगार निसर्गाचा आनंद व फेसाळणाऱ्या पांढरा शुभ्र धबधब्याचा आनंद पर्यटकंसाठी नेहमीच खुणावत असतो.

# दरडग्रस्त सुभाषनगरमधील ३७ कुटुंबांचे स्थलांतर

**खोपोली : प्रतिनिधी**

सुभाषनगर वसाहतीवरील दरडीचा धोका लक्षात घेऊन नगर परिषद प्रशासक, मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी नागरिकांची भेट घेऊन सुरक्षितस्थळी व्यवस्था करीत असल्याचा विश्वास दिला. नागरिकांनी प्रतिसाद दिल्यानंतर मस्को कॉलनीतील ३७ कुटुंबांचे स्थलांतर करण्यात आले आहे, तसेच काजुवाडीतील आठ कुटुंब आपल्या नातेवाईकांकडे राहण्यासाठी गेले आहेत.

खोपोली नगरपालिका हद्दीतील सुभाषनगर आणि काजूवाडी येथे दरडीचा धोका असल्ये नगर परिषदेचे प्रशासक मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी सुभाषनगरमधील नागरिकांची भेट गणेश मंदिर तसेच वासरंग शाळेत व्यवस्था करीत असल्याचे अवाहन केले दोन महिन्यांपासून करीत होते. यासंबंधीचे नोटीसही पालिकेने दिली होती, मात्र नागरिकांनी सुचविल्याप्रमाणे मस्को कॉलनीतील इमारत ठरविण्यात आली. मुख्याधिकारी दुरे यांनी कंपनी व्यवस्थापनाशी चर्चा केल्यावर जागा उपलब्ध झाली. त्यानंतर नगर परिषदेने युद्धपातळीवर वीज, पाणी, स्वच्छता करीत इमारतीची डागडुजी केली आहे. त्यानंतर सुभाषनगरमधील ३७ कुटुंबांचे स्थलांतर करण्यात आले आहे. काजूवाडी येथील आठ कुटुंबे नातेवाईकांकडे राहण्यासाठी जात असल्याचे त्यांनी सांगितले आहे.



सुभाषनगरमधील स्थलांतर करण्यासाठी उपमुख्याधिकारी गौतम भगळे, नोडल ऑफिसर प्रविण भोई, अनिल वानी, विनय शिपाई, सुरेश तारडे, विश्वनाथ फावडे, सतिश हडप, राहुल महाडीक, राजेश मोते, स्वप्निल लाटे, संतोष घोडविंदे, लक्ष्मण पाटील, चेतन कांबळे यांनी मेहनत घेतली.

**सुभाषनगर आणि काजूवाडीतील कुटुंबांनी पाच दिवसांपूर्वी सकारात्मक प्रतिसाद दिल्यावर मस्को कंपनीच्या इमारतीत पुढील चार महिने राहण्याची सोय केली आहे. उर्वरीत कुटुंबांना स्थलांतर करण्यासाठी नगर परिषद प्रयत्नशील आहे. आपत्कालीन परिस्थितीत घाबरून न जाऊ नका.**
**–अनुप दुरे, मुख्याधिकारी, नगर परिषद**

## निवडक



### जेएसएसतर्फे विविध ठिकाणी वृक्षारोपण

**अलिबाग** : जनशिक्षण संस्थान रायगड यांच्या माध्यमातून बुधवारी (दि. २६) चौल-अलिबाग व बिरवाडी-महाड येथे वृक्षारोपण व स्वच्छता मार्गदर्शन हा कार्यक्रम करण्यात आला. कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना संचालक डॉ. विजय हिरामण कोकणे यांच्या माध्यमातून स्वच्छतेची शपथही देण्यात आली, तसेच वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धन व प्रदूषण नियंत्रण असे मत डॉ. विजय हिरामण कोकणे यांनी मांडले. या वेळी कार्यक्रम अधिकारी प्रतिभा सिनगारे, सहायक कार्यक्रम अधिकारी वेदांती पाटील, प्रशिक्षिका पुजा रुमडे, रेखा घरत, रेश्मा कापडेकर, रेश्मा दळवी, कर्मचारी हिमांशू भालकर व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

### 'हिरवळ'च्या विद्यार्थ्यांचे सुयश

**माणगाव** : मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष बी. एससी. कॉम्प्युटर सायन्स विभागाचा निकाल सोमवारी जाहीर झाला. या परीक्षेत हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, महाड महाविद्यालयाचा निकाल ८९ टक्के लागला. विभागातून मुस्कान अखलाक पोरे प्रथम, कोमल दिगंबर कोल्हे द्वितीय तर अर्मुगान असिफ खेरटकर तृतीय क्रमांक पटकावला आहे, तसेच इतर विद्यार्थ्यांनीदेखील उत्तम गुण मिळवून यश प्राप्त केले आहे. ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया, संचालिका सोनाली धारिया, प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी, प्राचार्य सुदेश कदम, शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### रोहिदास दुसार यांना पीएचडी प्रदान

**मुरूड** : तालुक्यातील गोपाळवट गावातील सेवानिवृत्त अप्पर पोलीस अधीक्षक रोहिदास दुसार यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी पीएचडी प्रदान करण्यात आली. मायक्रो स्टडी ऑफ द ईव्हॉल्यूशन ऑफ सेंट्रल पोलीस ट्रेनिंग स्कूल इन बॉम्बे प्रेसिडेन्सी १८९७-१९१६मधील सेंट्रल पोलीस ट्रेनिंग स्कूलचा एक सूक्ष्म अभ्यास, उत्क्रांती या विषयावर प्रा डॉ. सुधाकर लहूपचांग यांच्या मार्गदर्शनाखाली रोहिदास दुसार यांनी संशोधन केले आणि प्रबंध सादर केला. प्रबंध संशोधकामी एचओडी, मुंबई विद्यापीठ डॉ. संदेश वाघ विशेष परिश्रम घेतले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण घेतले. नोकरी सांभाळून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. याव्यतिरिक्त त्यांचे सतत लेखन सुरू असते. एकूण त्यांची १८ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. हे यश प्राप्त केल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



# मुरूडमधील राम मंदिर लवकरच पूर्ण होणार

## भाजप नेते दिलीप भोईर यांचे ग्रामस्थांना आश्वासन

**मुरूड : प्रतिनिधी**

उसरोली ग्रामपंचायत हद्दीतील प्रसिद्ध श्रीराम मंदिराचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले आहे. या मंदिराचे रखडलेले काम पूर्ण व्हावे यासाठी ग्रामस्थांनी भाजपचे तालुका उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांची भेट घेतली. या वेळी भोईर यांनी ग्रामस्थांना राम मंदिर लवकर पूर्ण करण्यासाठी मी स्वतः लक्ष देणार असून लवकरात लवकर रखडलेले काम पूर्ण करून एक सुसज्ज व टुमदार मंदिर पूर्ण करणार असल्याचे आश्वासन दिले आहे.



श्री राम मंदिर हे ठाकूर कुटुंब खारीकवाडा यांचे आहे. या मंदिरासाठी पंचक्रोशीतील समाजाने आर्थिक मदत करूनही काही कारणाने हे मंदिर पूर्ण होऊ शकले नव्हते. दिलीप भोईर यांनी या मंदिराला भेट देऊन मंदिराचे स्लॅब पूर्ण करून देऊ, अशी ग्वाही दिली होती. त्याप्रमाणे बुधवारी (दि. २६) ग्रामस्थांनी भेट घेतल्यावर चार लाख रुपये रोख देऊन येत्या दोन दिवसांत कामाला सुरुवातसुद्धा होणार असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले.

या वेळी भोईर यांनी सांगितले की, हे काम धार्मिक असून मंदिर पूर्ण होण्यासाठी माझे प्रमाणिक प्रयत्न असणार आहे. मंदिराचे काम पूर्ण होण्यासाठी माझ्यासह इतरांचेसुद्धा सहकार्य मिळवून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण मंदिराचे काम पूर्ण व्हावे यासाठी स्वतःसह इतरांची मदत मिळावी, यासाठी परिश्रम घेत आहेत.

या वेळी ठाकूर कुटंबतील सर्व सदस्य तसेच गावातील मुरुड तालुका भाजप अध्यक्ष महेंद्र चौलकर, उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण, सागर मेस्त्री आदी उपस्थित होते.

# अलिबाग तालुक्यातील १३ ग्रामपंचायतीवर प्रशासक नियुक्त

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील सरपंचपदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ संपल्याने एकूण १३ ग्रामपंचायतीचा कारभार प्रशासकाचे हाती जिल्हा परिषद मुख्याधिकारी यांचे आदेशाने सोपविण्यात आला आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या वेळापत्रकानुसार ग्रामपंचायतीच्या निवडणुका घेणे शक्य झाले नसेल, तर अशा पंचायतीत प्रशासक म्हणून योग्य व्यक्तीची निवड करण्यात येते. मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून योग्य व्यक्तीची नियुक्ती करण्याचे शासन स्तरावरील अधिकार प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने संबंधीत जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना प्रदान करण्यात आला आहे.

त्यानुसार अलिबाग तालुक्यातील खंडाळे ग्रामपंचायतीत मंगेश पाटील आरोग्य विस्तार अधिकारी, वाडगाव ग्रामपंचायतीत दयाळु राठोड विस्तार अधिकारी पंचायत, किहिम ग्रामपंचायत मंगेश पाटील आरोग्य विस्तार अधिकारी, आवास ग्रामपंचायत ज्ञानेश्वर साळावकर पंचायत विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत मिळकतखार विजय साबळे कृषी विस्तार अधिकारी, माणकुळे ग्रामपंचायत विजय साबळे कृषी विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत चिंचवली हेमलता वाडेकर आरोग्य विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत पेढांबे हेमलता वाडेकर आरोग्य विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत कामार्ले प्रशासक प्रार्थना भोईर कृषी विस्तार अधिकारी, शहाबाज ग्रामपंचायत शर्मिला पाटील पंचायत विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत रेवदंडा दयाळू राठोड पंचायत विस्तार अधिकारी, नागाव ग्रामपंचायत ज्ञानेश्वर साळावकर पंचायत विस्तार अधिकारी यांची प्रशासक म्हणून नियुक्ती जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशाने करण्यात आली आहे.

# नेरळ ग्रामपंचायतीतील आंबेवाडीला दरडीचा धोका

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका आपत्ती व्यवस्थापन विभागाने नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील आंबेवाडीमधील सर्व ४२ कुटुंबांचे तत्काळ स्थलांतरण करावे, असे आदेश दिले होते. त्यानुसार नेरळ ग्रामपंचायतीकडून रात्रीच सर्व ४२ ग्रामस्थांना नोटिसा देण्यात आल्या असून त्यांची तात्पुरती राहण्याची व्यवस्था आनंदवाडी येथील जिल्हा परिषद शाळा आणि मोहाचीवाडी येथील साईबाबा संस्थान येथे करण्यात आली आहे. स्थानिक आदिवासी ग्रामस्थांनी आम्हाला धोका नाही आणि त्यामुळे आम्हाला हलवू नये, तसेच हलवायचे असल्यास आमच्या घरांची तसेच जनावरांची जबाबदारी प्रशासनाने घ्यावी, अशी मागणी केली आहे.

नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील माथेरान डोंगररांगामधील विकट गडाच्या पायथ्याशी असलेल्या आंबेवाडी येथील रहिवासी वस्तीवर दरडी कोसळण्याचे धोका असल्याचे त्यांचे स्थलांतरण करण्यात यावे, अशी सूचना कर्जत तालुका आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून सायंकाळी करण्यात आली. त्या ठिकाणी तहसीलदार डॉ. शीतल रसाळ, तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रशासक चंद्रकांत साबळे आणि पोलीस तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या प्रतिनिधी यांनी पाहणी केली. त्या वेळी वाडीच्या मागील बाजूस मोठा डोंगर असून, तो खाली आला तर मोठी दुर्घटना घडू शकते. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापन पथकाने नेरळ ग्रामपंचायत आणि नेरळ पोलीस ठाणे यांच्यासोबत बैठक घेऊन आंबेवाडीमधील सर्व ग्रामस्थांना हलविण्यात यावे, अशी सूचना केली.

नेरळ ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी गणेश गायकर तसेच सर्व कर्मचारी वर्ग यांच्यासह सरपंच उषा पारधी, उपसरपंच मंगेश म्हसकर, स्थानिक ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत सदस्य नितीन निरगुडा यांनी सर्व ग्रामस्थांशी चर्चा केली. शेवटी प्रशासनाच्या आदेशाने ग्रामपंचायतीकडून सर्व ४२ कुटुंबांना नोटिसा रात्रीच देण्यात देण्यात आल्या आहेत, तर त्या वाडीमधील सर्व २४० लोकांसाठी नेरळ ग्रामपंचायतीमधील मोहाची वाडी येथील साईबाबा संस्थानचे मंगल कार्यालय, आनंदवाडी येथील जिल्हा परिषद शाळा आणि नेरळ गावामधील बापूराव धारप सभागृह येथे तात्पुरती व्यवस्था केली आहे. संपूर्ण वाडी दरडग्रस्त असून सर्वांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे फलक नेरळ ग्रामपंचायतीकडून आज लावण्यात आले.



### घरे सोडण्यास ग्रामस्थांचा नकार

येथील आदिवासी लोक आपली घरे सोडून जाऊ शकत नाही, अशी ग्रामस्थांची भूमिका आहे. त्यांच्या जनावरांची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न आदिवासी लोकांनी उपस्थित केला आहे. आम्हाला घर बंद करून गेल्यावर तेथे प्रशासन राहण्याची व्यवस्था करणार आहे, परंतु तेथे खाण्याचे काही नियोजन आहे हे प्रशासन सांगत नाही. त्यामुळे आम्ही वाडी सोडून कोणत्या आणि कोणाच्या भरवशावर जायचे? असा प्रश्न विचारला आहे.

# प्रधानमंत्री पिक विमा योजनेची अर्ज करण्याचे आवाहन

**अलिबाग** : खरीप हंगामात प्रधानमंत्री पिक विमा योजनेची अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै असल्याने जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी होण्याचे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.

कृषी विभागामार्फत खरीप हंगामात शेतकऱ्यांना रासायनिक खते, कीटकनाशके किंवा बियाणे याबाबत तक्रार असल्यास (८४४६११७५००), (८४४६२२१७५०), (८४४६३३१७५०) या क्रमांकावर संपर्क साधावा, तसेच तक्रारींचे तत्काळ निवारण करण्यासाठी कृषी आयुक्तालयस्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला असून हा कक्ष २४ द ७ कार्यरत राहणार आहे, असे सांगण्यात आले आहे.

# आजपासून भारत-विंडीज वनडे मालिका

**बार्बाडोस : वृत्तसंस्था**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील कसोटी मालिकेतील दुसरा कसोटी सामना पावसामुळे अनिर्णित राहिल्यानंतर भारतीय संघाने कसोटी मालिका १-०ने जिंकली. आता दोन्ही संघ गुरुवार (दि. २७)पासून बार्बाडोस येथे तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत आमनेसामने येतील.



भारतीय संघाची या एकदिवसीय मालिकेसाठी आधीच घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर वेस्ट इंडिजने कसोटी मालिका पूर्ण झाल्यानंतर एकदिवसीय मालिकेसाठी संघाची घोषणा केली. शिमरॉन हेटमायर आणि वेगवान गोलंदाज ओशाने थॉमस यांचे वन डे संघात पुनरागमन झाले आहे, मात्र वरिष्ठ खेळाडू हे मेजर टी-२० लीग खेळण्यात व्यस्त असून त्याला त्यांनी पहिले प्राधान्य दिले आहे. यात माजी कर्णधार निकोलस पूरन आणि अष्टपैलू जेसन होल्डर यांचा समावेश आहे. या दोन खेळाडूंऐवजी वेगवान गोलंदाज जेडेन सील्स आणि यानिक कारिया यांना १५ सदस्यीय संघात स्थान मिळाले आहे.

२७ जुलैपासून सुरू होणाऱ्या मालिकेतील पहिले दोन सामने बार्बाडोसच्या किंगस्टन ओव्हलवर खेळवले जातील. यानंतर दोन्ही संघ १ ऑगस्टला त्रिनिदादला जातील, जिथे तिसरा एकदिवसीय सामना ब्रायन लारा क्रिकेट अकादमीत खेळवला जाईल.

## सात्विक-चिराग यांची जागतिक बॅडमिंटन दुहेरीत दुसऱ्या स्थानावर झेप

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

गेल्या काही महिन्यांत एकेक स्पर्धा जिंकत आणि शिरपेचात मानाचे नवे तुरे खोवत असलेले भारताचे दुहेरीतील साथीदार सात्विक आणि चिराग शेट्टी यांनी जागतिक बॅडमिंटनच्या पुरुष दुहेरीत प्रथमच दुसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे.



कोरियन ओपन स्पर्धेत गेल्या आठवड्यात उपांत्य फेरीत चीनच्या ज्या लियांग वेई केंग आणि वँह चँग यांचा पराभव केला होता. त्याच या जोडीला खाली खेचून सात्विक आणि चिराग यांनी हा दुसरा क्रमांक मिळवला आहे.

सात्विक-चिराग यांनी कोरियन ओपन (सुपर ५००), स्विस ओपन (सुपर ३००) आणि इंडोनेशिया ओपन (सुपर १०००) अशी तीन विजेतेपदे यंदाच्या मोसमात मिळवलेली आहेत.

# टीम इंडियाचा जम्बो कार्यक्रम

## बीसीसीआयने जाहीर केले वेळापत्रक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आगामी काळात ५ ऑक्टोबरपासून भारतात वन डे विश्वचषकाचा थरार रंगणार आहे. या बहुचर्चित स्पर्धेचे वेळापत्रक आयसीसीने जाहीर केले असून सलामीचा सामना इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात होणार आहे, तर कट्टर प्रतिस्पर्धी भारत आणि पाकिस्तान १५ ऑक्टोबर रोजी आमनेसामने असणार आहेत. अशातच भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) टीम इंडियाच्या आगामी १६ सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

एकूणच भारतीय संघ वन डे विश्वचषकापूर्वी ऑस्ट्रेलियाशी भिडणार आहे. टीम इंडियाच्या आगामी १६ सामन्यांचे वेळापत्रक जाहीर झाले असून यानुसार भारतीय संघ पाच कसोटी, तीन वन डे आणि आठ ट्वेंटी-२० सामने खेळणार आहे.

**वन डे मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाचा भारत दौरा**

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | सप्टेंबर | : मोहाली | दुपारी १.३० वाजल्यापासून |
| २४ | सप्टेंबर | : इंदौर | दुपारी १.३० वाजल्यापासून |
| २७ | सप्टेंबर | : राजकोट | दुपारी १.३० वाजल्यापासून |

**ट्वेंटी-२० मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाचा भारत दौरा**

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | नोव्हेंबर | : वायझॅग | सायंकाळी ७ वाजल्यापासून |
| २६ | नोव्हेंबर | : त्रिवेंद्रम, | सायंकाली ७ वाजल्यापासून |
| २८ | नोव्हेंबर | : गुवाहाटी | सायंकाळी ७ वाजल्यापासून |
| १ | डिसेंबर | : नागपूर | सायंकाळी ७ वाजल्यापासून |
| ३ | डिसेंबर | : हैदराबाद, | सायंकाळी ७ वाजल्यापासून |

**ट्वेंटी-२० मालिकेसाठी अफगाणिस्तानचा भारत दौरा**


| | | |
|---|---|---|
| ११ | जानेवारी | : मोहाली |
| १४ | जानेवारी | : इंदौर |
| १७ | जानेवारी | : बंगळुरू |



**कसोटी मालिकेसाठी इंग्लंडचा भारत दौरा**

| | | |
|---|---|---|
| २५-१९ | जानेवारी | : हैदराबाद |
| ०२-०६ | फेब्रुवारी | : वायझॅग |
| १५-१९ | फेब्रुवारी | : राजकोट |
| २३-२७ | फेब्रुवारी | : रांची |
| ७-११ | मार्च | : धर्मशाला |

# आर अश्विनने टाकले हरभजनला मागे



**त्रिनिनाद : वृत्तसंस्था**

भारत-वेस्ट इंडिज कसोटी मालिका भारताने १-० अशा फरकाने जिंकली. आर अश्विनने पहिल्या कसोटीत एकूण १२ आणि दुसऱ्या कसोटीत तीन विकेट घेतल्या. यासह अश्विनने कसोटी क्रिकेटमध्ये पराक्रम केला आहे.

अश्विन हा भारताचा दुसरा सर्वांत यशस्वी आणि भारतासाठी कसोटीत सर्वाधिक विकेट घेणारा द्वितीय गोलंदाज ठरला आहे. त्याने हरभजन सिंगला मागे टाकले आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात अश्विनने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला. त्याने दुसऱ्या कसोटीत एकूण तीन विकेट घेत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट्स घेण्याच्या बाबतीत हरभजनला मागे टाकले असून भारतासाठी सर्वाधिक विकेट घेणारा दुसरा गोलंदाज ठरला आहे.

**कुंबळेचा विक्रमही मोडला**

*स्टार फिरकीपटू आर अश्विनने वेस्ट इंडिजविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत म्हणजे दुसऱ्या कसोटीच्या चौथ्या दिवसापर्यंत एकूण १५ विकेट घेतले. यासह त्याने वेस्ट इंडिजविरुद्ध सर्वाधिक विकेट्स घेण्याच्या बाबतीत अनिल कुंबळेला मागे टाकले आहे. वास्तविक कुंबळेने वेस्ट इंडिजविरुद्ध ७४ कसोटी विकेट घेतल्या, तर अश्विनने आतापर्यंत ७५ विकेट्स घेतल्या आहेत. या यादीत पहिले स्थानावर कपिल देव यांचे नाव आहे, ज्यांनी ८९ विकेट्स घेतल्या आहेत.*

# लिओनेल मेस्सी इंटर मियामीचा नवा कर्णधार

**अर्जेंटिना : वृत्तसंस्था**

अर्जेंटिनाचा स्टार फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीने शुक्रवारी अमेरिकेच्या फुटबॉल क्लब इंटर मियामीसाठी पदार्पणाच्या सामन्यात उत्तम कामगिरी केली. मेस्सीने नेत्रदीपक फ्री किकवर गोल करून इंटर मियामीला लीग कप सामन्यात मेक्सिकन क्लब क्रुझ अझुल विरुद्ध २-१ असा रोमांचक विजय मिळवून दिला होता.



या दरम्यान इंटर मियामीचे मुख्य प्रशिक्षक गेरार्डो टाटा मार्टिनो यांच्या मते, मेस्सी इंटर मियामीचा नवा कर्णधार होईल. मेस्सी किती काळ मैदानावर असेल, हे त्याच्या फिटनेसवर अवलंबून असल्याचे सांगितले.

मार्टिनोने म्हणाले की, मेस्सी आणि सर्जिओ बुस्केट्स हे दोघेही सुरुवातीपासूनच खेळण्याची शक्यता आहे. पण त्यांना कसे वाटते यावर सर्व काही अवलंबून असेल. हा त्याचा दुसरा गेम आहे.











॥ भावपुर्ण श्रध्दांजली ॥



**स्व. लक्ष्मण गोवर ठाकूर**

मृत्यु :- मिती अधिक श्रावण शु. ४, शके १९४५, शुक्रवार दि. २१/०७/२०२३ रोजी

**दशक्रिया विधी**

रविवार दि. ३०/०७/२०२३ रोजी श्री क्षेत्र नाशिक येथे

**उत्तरकार्य विधी**

मंगळवार दि. ०१/०८/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता (राहत्याघरी)

| दिनांक | कार्यक्रम |
|---|---|
| २७/०७/२०२३ (गुरुवार) सायं. ७ ते ९ | राधाकृष्ण भजन मंडळ शिवाजीनगर, बुवा :- श्री. रसिकलाल कानडा, तबला :- कु. ऋतुजा कानडा. |
| २८/०७/२०२३ (शुक्रवार) सायं. ७ ते ९ | श्री गावदेवी भजन मंडळ न्हावा, बुवा :- श्री. महेश पाटील, पखवाज :-श्री. महादेव ठाकुर. |
| २९/०७/२०२३ (शनिवार) सायं. ७ ते ९ | आदिशक्ती प्रासादिक महिला भजन मंडळ बोरखार, बुवा :- प्रगती श्रीकांत डाकी, पखवाज :- गुरुवर्य श्री. सुहास ठाकूर. |
| ३०/०७/२०२३ (रविवार) | दशक्रिया विधी |
| ३१/०७/२०२३ (सोमवार) सायं. ७ ते ९ | विश्वनाथ बुवा संगीत विद्यालय दिघोडे प्रस्तुत 'भक्तीधारा', गुरुवर्य :- श्री.सुहास ठाकूर सर (धुतूम), गायक :- मृणाली ठाकुर, संचाली पाटील, प्रगती डाकी, प्रियांशी डाकी, पुजा म्हात्रे, पखवाजः- आयुष म्हात्रे, तबला :- विनित ठाकूर, |
| ०१/०८/२०२३ (मंगळवार) सायं. ७ ते ९ | श्री गुरुकृपा भजन मंडळ, कोपर, बुवा -सौ. सुप्रिया समीर घरत, पखवाज-श्री. तुषार घरत, तबला -कु. मिलींद कडू, टाळ -कु. उमेश गावंड. |

शोकाकुल
**समस्त ठाकूर परिवार**

पत्ता: मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड.


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com